# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

यांच्याशी संलग्नित

शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे

## राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

## इतिहास विभाग

यांना

तृतीय वर्ष कला या पदवीकरिता सादर करावयाचा संशोधन प्रकल्प

# ''ऐतिहासिक तेर : उत्खनने व इतिहास''


सादरकर्ता

प्रविण विष्णू येरनाले

विद्यार्थी, तृतीय वर्ष कला

मार्गदर्शक

लेफ्ट. डॉ. अर्चना टाक

सहाय्यक प्राध्यापक व इतिहास विभागप्रमुख

डॉ. महादेव गव्हाणे

प्राचार्य

राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त),

लातूर-४१३५१२


एप्रिल २०२३

# प्रतिज्ञापत्र

**“ऐतिहासिक तेर : उत्खनने व इतिहास”** या विषयावरील प्रस्तुत प्रकल्प मी राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर यांच्या तृतीय वर्ष कला या पदवीसाठी लिहिलेला आहे. या प्रकल्पात समाविष्ट करण्यात आलेले कार्य माझ्या स्वतःच्या प्रयत्नांचे फलित आहे. त्यासाठी माझ्या मार्गदर्शकांकडून मिळालेले मार्गदर्शन आणि यापूर्वी झालेल्या संशोधनांचे संदर्भ याशिवाय कशाचीही मदत घेण्यात आली नाही. उपयोगात आणलेल्या संदर्भांचा योग्य निर्देश करण्यात आला आहे. हा प्रकल्प अथवा त्याचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही व कोणत्याही परिक्षेसाठी सादर केलेला नाही.

**Exam Seat No.:** RAS2360098

**स्थळ:** लातूर.

**दिनांक: ०६/०४/२०२३**

**प्रविण विष्णू येरनाले**
विद्यार्थी
तृतीय वर्ष कला
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

यांच्याशी सलग्नित

शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे

# राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

## इतिहास विभाग

तृतीय वर्ष कला

२०२२-२३

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, प्रविण विष्णू येरनाले यांनी राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर यांच्या तृतीय वर्ष कला या पदवीसाठी सादर केलेल्या "ऐतिहासिक तेर : उत्खनने व इतिहास" हा संशोधन प्रकल्प माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. प्रकल्प लेखनात ज्या संदर्भ साधनांचा आधार घेण्यात आला आहे, त्याचा यथोचित निर्देश केला आहे. प्रविण विष्णू येरनाले यांनी हा प्रकल्प स्वतंत्ररित्या लिहिला असून तो इतर कोणत्याही विद्यापीठात, कोणत्याही अन्य परिक्षेसाठी सादर केला नाही. सदरचा प्रकल्प राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या तृतीय वर्ष कला (Bachelor of Arts) या पदवीसाठी सादर करण्याची माझी अनुमती आहे.

**Exam Seat No.:** RAS2360098

**स्थळ**: लातूर

**दिनांक**: ०६/०४/२०२३

**मार्गदर्शक**

**लेफ्ट. डॉ. अर्चना धनराज टाक**
सहाय्यक प्राध्यापक व विभागप्रमुख
इतिहास विभाग
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर

**डॉ. महादेव गव्हाणे**
प्राचार्य
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर
पिन कोड – ४१३५१२

# ऋणनिर्देश...

आयुष्यात अनेक लोक हे आपल्याला भेटत असतात, जेव्हा एखादे चांगले काम करण्यासाठी आपण हातात घेतो, तेव्हा काही लोक ते काम पूर्ण करण्यासाठी सहकार्य करत असतात, तर काही लोक त्या कामात अडचणी कशा निर्माण होतील याची वाट पाहत असतात. परंतु अशा चांगल्या कामात मला साथ देणारे, मला प्रोत्साहन देणारे, मला सहकार्य करणारे अनेकजण आहेत, त्यांचा उल्लेख केल्याशिवाय ह्या प्रकल्प अभ्यासास पुर्णत्व येणार नाही.

कोणतेही कार्य करण्याचे निश्चित केल्यास त्या कार्याचा संकल्प व्यवस्थिपणे पूर्ण होण्यासाठी त्या व्यक्तीला स्वतः प्रयत्न करावे लागतात, परंतु आसपासच्या अन्य व्यक्तींचा मोलाचा सहभाग, सहकार्य असल्याशिवय ते शक्य होत नाही. प्रस्तुत प्रकल्प अभ्यासाचा विषय निश्चित करण्यापासून ते प्रकल्प अभ्यास कार्य पूर्णत्वास नेण्यापर्यंत अनेकांचे अनेक प्रकारे अत्यंत अनमोल सहकार्य लाभले आहे. याठिकाणी त्यांचे आभार मानने उचित ठरेल असे मला वाटते.

ऋषितुल्य व्यक्तिमत्व असलेले शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदरणीय डॉ. गोपाळरावजी पाटील साहेब, उपाध्यक्ष आदरणीय डॉ. पी. आर. देशमुख सर, लातूर पॅटर्नचे जनक असलेले संस्थेचे सचिव आदरणीय प्राचार्य अनिरुद्ध जाधव सर, सहसचिव आदरणीय श्री. गोपाळ शिंदे सर, सहसचिव आदरणीय श्री. सुनील सोनवणे सर, सदस्य आदरणीय डॉ. रावसाहेब कावळे सर यांच्या आशीर्वादाचे हात माझ्या डोक्यावर असल्यामुळेच मी हे प्रकल्प लेखन कार्य पूर्ण करू शकलो.

प्रत्येक चांगल्या कामासाठी आम्हां सर्व विद्यार्थ्यांच्या  पाठीवर कौतुकाची थाप देणारे व तितक्याच कर्तव्यदक्षपणाने आमच्या चुका निदर्शनास आणुन देणारे प्रसन्न व्यक्तिमत्त्व असलेले, आमचे पूज्यनीय प्रेरणास्थान असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय डॉ. महादेव गव्हाणे सर  आणि उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे सर यांनी मला सतत दिलेले प्रोत्साहन व त्यांनी केलेले सहकार्य याबद्दल मी त्यांचे आभार न मानता त्यांच्या ऋणातच राहणे पसंत करीन.

कोणत्याही कार्याची पुर्तता होण्यासाठी उत्कृष्ट व चांगले मार्गदर्शन मिळणे आवश्यक असते. असेच मार्गदर्शक मला मिळाले, राजर्षी शाहू महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख लेफ्ट. डॉ. अर्चना टाक यांनी संपूर्ण प्रकल्प अभ्यास प्रक्रियेमध्ये केलेल्या उत्कृष्ट, अचुक व मौलिक

मार्गदर्शनामुळेच मी प्रकल्प लेखन कार्य पूर्ण करू शकलो. त्यांनी वेळोवेळी मार्गदर्शन करून, प्रोत्साहन देऊन, वेळ, काळ व स्थळाचे बंधन न ठेवता निरपेक्ष व कर्तव्यबुध्दीने मार्गदर्शन केलेले आहे. तसेच त्यांनी या संपूर्ण प्रकल्पाची छपाई अल्पवेळेत व सुबकपणे विनामुल्य करून दिल्यामुळेच हे कार्य निहित वेळेत पूर्ण होऊ शकले. त्यामुळे मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे.

इतिहास विभागातील प्राध्यापक डॉ. प्रियदर्शनी पाटील व डॉ. राहुल मोरे यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचेही आभार मानतो.

कुटुंबाच्या सहकार्याशिवाय कोणतेही काम करणे कठीण असते. कुटुंबाकडून आपल्याला मानसिक आधार मिळत असतो. असा मानसिक आधार दिल्याबद्दल मी माझे पूज्यनीय आई-वडील सौ. मनीषा व श्री. विष्णू येरनाले यांचे मनापासून आभार मानतो. तसेच माझी बहिण कु. सुवर्णा तसेच भावाप्रमाणेच सतत पाठीशी उभे असलेले माझे मित्र-मैत्रिणी संतोष इंद्राळे, तेजस घाटूळे, विवेक भोसले, कु. कोमल राठोड व बुशरा शेख यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचेही मनापासून आभार मानतो.

**धन्यवाद !!!**

**प्रविण विष्णू येरनाले**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | घटक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| **१** | **प्रकल्प अभ्यास पद्धती** | **१-७** |
| १ | प्रस्तावना | १-४ |
| २ | प्रकल्प अभ्यास विषयाची निवड | ४ |
| ३ | पूर्व अभ्यासाचा आढावा | ४ |
| ४ | प्रकल्प अभ्यास विषयाची गरज | ४-५ |
| ५ | प्रकल्प अभ्यास विषयाचे महत्व | ५ |
| ६ | समस्या विधान | ५ |
| ७ | प्रकल्प अभ्यास विषयाचे उद्देश | ५-६ |
| ८ | प्रकल्प अभ्यासाची गृहीतके | ६ |
| ९ | प्रकल्प अभ्यास प्रश्न | ६ |
| १० | प्रकल्प विषयाची व्याप्ती | ६ |
| ११ | प्रकल्प अभ्यासाची परिमर्यादा | ६ |
| १२ | प्रकल्प अभ्यासाची मर्यादा | ६-७ |
| १३ | माहिती संकलनाचे स्त्रोत | ७ |
| **२** | **तेर येथील उत्खनने** | **८-१०** |
| **३** | **तेरचा इतिहास** | **११-१७** |
| **४** | **तेर मधील प्राचीन अवशेषांचा अभ्यास** | **१८-२२** |
| **५** | **कै. रामलिंगाप्पा लामतुरे शासकीय वस्तुसंग्रहालय, तेर** | **२३-२४** |
| **६** | **उपसंहार** | **२५-२९** |
| | **संदर्भ सूची** | |
| | **परिशिष्ट** | |
| | **छायाचित्रे** | |

# प्रकरण पहिले :
# प्रकल्प अभ्यास पद्धती

## प्रकरण पहिले

## प्रकल्प अभ्यास पद्धती

### १. प्रस्तावना :-

माझ्या संशोधनाचा विषय “ऐतिहासिक तेर : उत्खनने व इतिहास” हा आहे. महाविद्यालयातील इतिहास विभागांतर्गत या विषयावर आजपर्यंत कोणीही प्रकल्प अभ्यास लेखन कार्य केलेले नाही. तसेच संदर्भ साधने मोठ्या प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे मी प्रकल्प अभ्यासासाठी या विषयाची निवड केली. उस्मानाबाद जिल्ह्यात तेरणा नदीच्या काठी वसलेले 'तेर' हे गाव आहे. उस्मानाबाद शहरापासून २३ किमी अंतरावर प्राचीन वारसा लाभलेले तेर हे गाव आहे. प्राचीनकाळी तेर हे गाव शिल्प, कला व व्यापार या दृष्टीने प्रसिद्ध होते. या गावचे धार्मिक दृष्टीने एक वेगळे महत्त्व देखील आहे. मराठी भाषेचे कवी व वारकरी संप्रदायाचे विठ्ठल भक्त संत गोरोबा काका यांची समाधी ही तेर या गावीच आहे. गोरोबा काकांची समाधी तेरणा नदीच्या काठी बांधलेली आहे. या धार्मिक महत्वाव्यतिरिक्त तेर हे आपल्या प्राचीन शिल्प, व्यापारासाठी प्रसिद्ध आहे. गावात जैन मंदिरे व बौद्ध स्तूप आहेत. यातील बरीचशी बौद्ध स्तूपे ही उत्खननात सापडलेली आहेत. तेरमध्ये एक सरकारी वस्तूसंग्रहालय आहे ज्यात जुन्या वस्तूंचा संग्रह आहे. कै. रामलिंगप्पा लामतुरे शासकीय ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय असे त्याचे नाव आहे या वस्तुसंग्रहालयात दुर्मिळ वस्तूंचा संग्रह आहे. शंखाच्या बांगड्या, हस्तदंताची स्त्री मुर्ती बौद्ध धर्मियांची धार्मिक चिन्हे असलेली नाणी, मणी, ताईत, दिवे, पुतळया, बांतूची नाणी इ. वस्तूंचा या संग्रहालयात समावेश आहे. आपल्याला यावरूनच तेरचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात येते. तर या गावचे नाव इसवी सनाच्या पूर्वीपासुनच व्यापारासाठी प्रसिद्ध आहे. ग्रीकदेशीय खलाश्याने आपल्या 'पेरिप्लस ऑफ द एरिथ्रियन सी' या पुस्तकातून तगर या नावाने तेरचा उल्लेख केलेला दिसून येतो. तगर येथून कापड, मलमल याचा व्यापार केला जायचा.

काही प्राचीन ग्रंथात तेर या गावाचे तगर, तगरपुर, तगरनगर असा उल्लेख आढळून येतो. संस्कृत भाषेत या नगराला ‘तगरम्। असे म्हटले जाते. प्राचीन काळी तेर हे एक व्यापारी नगर घेते. तेर ते उज्जयी हा प्राचीन काळी प्रमुख व्यापारी मार्ग होता. सातवाहन राजांच्या काळात या नगरीने यशाचे, प्रगतीचे शिखर गाठले होते. तेरचा त्याकाळी युरोपमधील रोम व ग्रीस देशांशी व्यापारी संबंध होता. या अश्या ऐतिहासिक तेरच्या संशोधनासाठी केलेल्या उत्खननात सातवाहनकालीन नाणी सापडली आहेत. तेथे शिलाहारांची नाणी व मुद्रा सापडल्या आहेत. महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्व खात्याने केलेल्या उत्खननात सातवाहनकालीन स्तूपांचे अवशेष, नाणी, मूर्ति, रोमन मृत्पात्रे व पुतळया सापडल्या आहेत. प्राचीन स्तूपांचे अवशेष ही तेरमध्ये सापडले आहेत.

इ. स. पूर्व दुसऱ्या शतकात सातवाहनांनी बौद्ध धर्माला राजाश्रय दिला होता. त्यामुळे त्यांनी तेर येथे अनेक स्तूप बांधले, ज्याचे अवशेष उत्खननात प्राप्त झाले आहेत. तेर मधील पांढऱ्या मातीच्या टेकड्यांतील उत्खननात सातवाहनकालीन नाणी सापडली आहेत. पांढऱ्या मातीचे टेकाडे म्हणजे प्राचीन वस्तीचे अवशेष असलेले टेकाडे असतात. अशी पांढरी टेकाडे तेरमध्ये मोठ्या प्रमाणात आढळतात. अश्या टेकाड्यांचे संशोधन, उत्खनन केल्यास, तेथे तेरच्या प्राचीन इतिहासाचे अवशेष सापडतात. ज्यामुळे तेरचा इतिहास नव्याने उलगडला जाऊ शकतो. यासाठी पुरातत्व विभागाने तेरमध्ये उत्खनने केलेली आहेत. ज्यामध्ये प्राचीन तेरचे अवशेष मिळालेले आहेत.

उत्खनन आणि पुरातत्वशास्त्र समजून घेतल्यानंतरच आपल्याला प्राचीन वास्तू सुरक्षित जतन करून ठेवता येतात. त्यामुळे आपण उत्खनन आणि पुरातत्वशास्त्राची थोडी माहिती करून घेवूया. इ.स.पू. ६ व्या शतकातिल बाबिलोनचा राजा नबोनिदास याला प्राचीन अवशेषांचा आद्य संशोधक मानले जाते. सिप्पर येथे शमाश देवतेच्या मंदिराची दुरुस्ती करताना त्याने पाया खणला, तेव्हा सुमारे २० फूटांवर त्याला त्याच मंदिराचा त्यातूनही २००० वर्षापुर्वीचा पाया सापडला. याशिवाय या राजाने आपल्या राजवाड्यात एक प्राचीन वस्तूंचे संग्रहालयही बनवून घेतले होते.

पुरातत्वविद्येचा इतिहासाशी अतिशय घनिष्ट संबंध आहे. इतिहासाची जी अनेक साधने असतात, त्यापैकी पुरातत्वविदद्या हे एक महत्त्वाचे साधन आहे. इतिहासातील घटनांचा लेखी पुरावा उपलक्ष्य असला तरी कित्येक वेळा त्या घटना सिद्ध करण्यासाठी केवळ पुरातत्वीय पुराव्यावर अवलंबून रहावे लागते. पुरातत्वविद्येचे मुख्य म्हणजे प्राचीन मानवी संस्कृतीचा अभ्यास करणे हा आहे. पण पुरातत्वविद्या म्हणजे प्राचीन संस्कृतीचे केवळ वर्णन किंवा अभ्यास करणे नव्हे, तर प्राचीन अवशेषांचे संशोधन करून त्याचे जतन करून मानवाच्या सांस्कृतिक काळाचा अभ्यास करणे हे पुरातत्वविद्येचे मुख्य उद्दिष्ट असते.

उत्खनन म्हणजे काय तर जमिनीमध्ये गाडले गेलेले पुरातन अवशेष उकरून काढणे, असे आपण सर्वसाधारणपणे म्हणू शकतो. विविध कामासाठी आपण खोदकाम करत असताना आपल्याला काही जुने अवशेष मिळतीलच असे नाही. ठराविक ठिकाणीच अवशेष मिळतात आणि मग तिथे पुरातत्व विभागाकडून उत्खनन करण्यात येते. हे उत्खनन करत असताना आपल्याला विविध मातीचे रंग आढळतात. हवामानात सतत बदल होत असतो. त्यामुळे मातीच्या रंगात बदल होत असतो. त्यामुळे मातीचे एकावर एक थर तयार होतात आणि प्रत्येक थराचा रंग हा वेगळा असतो. तर थोडक्यात आपल्याला उत्खनन काय आणि ते कशा पद्धतीने केले जाते ते सांगता येईल. कोणतेही उत्खनन करण्यापूर्वी भारतीय पुरात्व विभागाची परवानगी व इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करण्याची आवश्यकता असते. मूळात उत्खनन हा

विषय खूप जटील आहे. एखाद्या ठिकाणी अवशेष सापडले, तर तिथे लगेच उत्खनन करता येत नाही. उत्खनन  करण्यासाठी त्या भागातील हवामानाचा अंदाज लक्षात घ्यावा लागतो. आपल्याकडे भारतात साधारणपणे हिवाळयात उत्खनने केली जातात. पण प्रत्येक ठिकाण आाणि तेथिल वातावरण लक्षात घेऊन उत्खनन केले जाते. उत्खननात मिळालेल्या  वस्तूंचा, अवशेषांचा अभ्यास प्रस्तुत प्रकल्पात करण्यात आला आहे .

**उत्खनन:**

उत्खननाला हिंदी भाषेत 'खुदाई' आणि इंग्रजी भाषेत Excavation म्हणतात. आजकाल, प्रामुख्याने जमिनीत खोदणे, पुरातन अवशेष शोधणे, खोलवर गाडलेले दगड काढणे या प्रक्रियेला उत्खनन म्हणतात . विविध कामांसाठी मूळ जागी असलेली माती व खडक सैल करणे, उकरणे, दुसरीकडे वाहून नेणे व पसरणे या क्रियांचा उत्खननात समावेश होतो. धरणे व इमारती बांधणे, रस्ते तयार करणे, उपयुक्त खनिज निक्षेप खणून काढणे इत्यादींसाठी उत्खनन करावे लागते. याकरिता विविध प्रकारची यंत्रोपकरणे वापरण्यात येतात. निसर्गतः भूमिगत झालेले प्राचीन संस्कृतींचे विविध प्रकारचे अवशेष शोधून काढण्यासाठी पुरातत्त्वीय उत्खनन करण्यात येते.

**पुरातत्वशास्त्र:-**

विश्वाची उत्पत्ती कशी झाली याचा शोध मानवाला सतत घ्यायचा असतो. त्याबाबत अधिकाधिक माहिती मिळवायची असते. विश्वाच्या उत्पत्तीचा शोध घेण्यासाठी अंतराळ संशोधन जसे महत्त्वाचे तसे मानवी जातीच्या मुळाचा शोध घेण्यासाठी पुरातत्त्वीय उत्खननही तितकेच महत्त्वाचे असते. अनेक संस्कृती कालौघात बहुतांश नामशेष झाल्या, असा समज असला तरी गेल्या दोन शतकांपासून उत्खननात त्यांचे काही अवशेष पुरातत्त्वशास्त्रज्ञांना मिळत गेले. अर्थातच त्याबाबतची अधिकाधिक माहिती मिळवण्यासाठी जगभरात शास्त्रशुद्धपणे उत्खनन करण्यात येऊ लागले. हडप्पा आणि मोहेंजोदडो इथे अत्यंत प्रगत अशा सिंधू संस्कृतीचे (इंडस व्हॅली सिव्हिलायझेशनचे) पुरावे मिळाले होते आणि त्यांतून आश्चर्यकारक गोष्टी समोर आल्या होत्या. काही हजार वर्षांपूर्वीची ही संस्कृती अतिशय प्रगत होती. त्यांनी आदर्शवत नगरे उभी केली होती. त्यांतील इमारती, कालवे, इतकेच काय पण सांडपाणी आणि मैल निचरा यांचीही योग्य व्यवस्था होती. प्रत्येक गोष्ट अगदी विचारपूर्वक, योग्य आखणी करून, पद्धतशीरपणे निर्माण केली गेली होती. उत्खननामुळे संशोधकांना याविषयी विस्ताराने माहिती मिळाली. अर्थातच मग जगभर अशी उत्खनने केली जाऊ लागली आणि त्यातून मानवी इतिहासाबाबतची नवनवीन माहिती प्रकाशात येऊ लागली.

पुरातत्वशास्त्र हे असे  विज्ञान आहे जे प्राचीन वस्तूंचा अभ्यास आणि विश्लेषण करून मानवी संस्कृतीचा विकास समजून घेण्याचे आणि स्पष्ट करण्याचे कार्य करते. हे विज्ञान प्राचीन काळातील अवशेष आणि भौतिक उत्खननाच्या विश्लेषणाच्या आधारे भूतकाळातील मानवी समाजाचा सांस्कृतिक-वैज्ञानिक अभ्यास करते. यासाठी प्राचीन वास्तू, घरगुती वस्तू, नाणी, मणी, खेळणी, शेतीविषयक कामे, अवजारे, उपकरणे, जैविक तथ्ये आणि सध्याच्या मानवाच्या पूर्वजांनी वापरलेली भूस्वरूपे यांचा अभ्यास केला जातो. पुरातत्वशास्त्र म्हणजे मानवाने सोडलेल्या कलाकृती, आर्किटेक्चर आणि सांस्कृतिक लँडस्केप यासारख्या पर्यावरणीय डेटा आणि भौतिक संस्कृतीच्या पुनर्प्राप्ती आणि विश्लेषणाद्वारे भूतकाळातील मानवी क्रियाकलापांचा अभ्यास होय. काळ पुढे जात राहिला तरीही मानवाची उत्सुकता काही कमी होत नाही. त्यामुळे अशी संशोधने चालूच राहणार आणि त्यांतून आपल्याला आपल्या प्राचीन इतिहासातील महत्त्वाच्या अनेक आश्चर्यकारक बाबी दृष्टोत्पत्तीस येणार हे नक्की.

**२. अभ्यास विषयाची निवड:-**

माझ्या प्रकल्प अभ्यासासाठी “ऐतिहासिक तेर : उत्खनने व इतिहास ” या विषयाची निवड मी केलेली आहे. तेरविषयी असलेल्या आकर्षणामुळे हा विषय मी घेतला  आहे.

**३. पूर्व प्रकल्प अभ्याचा आढावा:-**

“ऐतिहासिक तेर : उत्खनने व इतिहास” हा विषय मी प्रकल्प अभ्यासासाठी निवडलेला आहे. संशोधन अभ्यासाचा विषय निवडत असताना असा विषय निवडला जातो की, ज्याची माहिती मोठ्या प्रमाणात सहजरित्या उपलब्ध होईल किंवा जो विषय संशोधन अभ्यासासाठी आपल्या परिसरात कोणी निवडलेलाच नाही. राजर्षी शाहू महाविद्यालयातील इतिहास विभागाद्वारे “ऐतिहासिक तेर : उत्खनने व इतिहास ” या विषयावर प्रकल्प अभ्यास लेखन झालेले नाही, त्यामुळे मी या विषयाची निवड केलेली आहे.

**४. प्रकल्प अभ्यासाची गरज:- (Needs of the Research)**

१. इतर अभ्यासकांना कार्यप्रेरणा मिळवण्यासाठी सदर विषयावर अभ्यास होणे गरजेचे आहे.

२. या विषयावर कमी प्रमाणात अभ्यास झालेला आहे. त्यामुळे सदर विषयावर अभ्यास होणे गरजेचे आहे.

३. महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक इतिहासाला कलाटणी देणाऱ्या सातवाहन राजवटीतील तेर हे तत्कालीन जगातील एक महत्वाचे औद्योगिक केंद्र होते. त्यामुळे तेथील उत्खनने व इतिहास या विषयावर अभ्यास होणे गरजेचे आहे.

४. महाराष्ट्रातील पहिला ज्ञात राजवंश असलेल्या सातवाहन घराण्याच्या कामगिरीचा अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांना अभ्यासाची दिशा मिळण्यासाठी सदर विषयावर अभ्यास होणे गरजेचे आहे.

### ५. प्रकल्प अभ्यासाचे महत्व: (Significance of the Research)

१) सातवाहनकालीन सामाजिक जीवन समजण्यासाठी प्रस्तुत विषयावर अभ्यास होणे महत्वाचे आहे.

२) सातवाहनकालीन सांस्कृतिक जीवन समजण्यासाठी प्रस्तुत विषयावर अभ्यास होणे महत्वाचे आहे.

३) महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक विकासात सातवाहन घराण्याने कशा प्रकारे योगदान दिलेले आहे, हे समजण्यासाठी सदर विषयावर अभ्यास होणे महत्वाचे आहे.

४) सातवाहनकालीन इतिहास सद्यस्थितीत प्रेरणादायी ठरविण्यासाठी सदर विषयावर अभ्यास होणे महत्वाचे आहे.

### ६. समस्या विधान (Origin of the Research Problem)

तेर या गावाच्या सातवाहनकालीन प्राचीन इतिहासाचा तेथील उत्खननांच्या संदर्भात अभ्यास करणे.

### ७. प्रकल्प अभ्यास विषयाचे उद्देश :- (Objectives)

१. प्राचीन महाराष्ट्रातील सातवाहन घराण्याच्या इतिहासाचा अभ्यास करणे.

२. उत्खनन म्हणजे काय? याचा अभ्यास करणे.

३. तेर या गावामध्ये आत्तापर्यंत झालेल्या उत्खननांचा अभ्यास करणे.

४. या पॅटर्नची विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये काय उपयुक्तता आहे याचा अभ्यास करणे.

**८. प्रकल्प अभ्यासाची गृहीतके:**

**१.** तेर या गावाला सातवाहनकालीन प्राचीन इतिहासाचा समृद्ध वारसा लाभलेला आहे.

**२.** सातवाहनकालीन इतिहासावर अजून जास्त प्रकाश पडण्यासाठी तेर या गावामध्ये आणखीन उत्खनने होणे गरजेचे आहे.

**३.** आजच्या उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर हे गाव सातवाहन काळातील आंतरराष्ट्रीय पातळीवरील एक नामांकित औद्योगिक केंद्र होते.

९. **प्रकल्प अभ्यास प्रश्न:**

**१.** उत्खनन म्हणजे काय?

**२.** आत्तापर्यंत तेर येथील उत्खनांमध्ये कोणी-कोणी सहभाग घेतलेला आहे?

**३.** तेर येथे कै .रामलिंगाप्पा लामतुरे शासकीय वस्तुसंग्रहालयाची स्थापना कशी झाली?

१०. **प्रकल्प अभ्यासाची व्याप्ती: (Scope of the Research)**

१. प्रस्तुत अभ्यास हा सातवाहनकालीन फक्त तेर या गावाशी संबंधित आहे.

२. प्रस्तुत अभ्यास तेर या गावात आत्तापर्यंत झालेल्या प्रत्येक उत्खननांशी संबंधित आहे.

**११. प्रकल्प अभ्यासाची परिमर्यादा: (De-Limitations of the Research)**

१. प्रस्तुत अभ्यासात फक्त तेर या गावाचाच विचार केलेला आहे .

२. प्रस्तुत अभ्यासात फक्त तेर येथील सातवाहनकालीन इतिहासाचा विचार केलेला आहे .

१२. **प्रकल्प अभ्यासाची मर्यादा: (Limitations of the Research)**

१. प्रस्तुत अभ्यासासाठी सर्व्हेक्षण पद्धतीचा वापर केला जाणार आहे.

२. प्रस्तुत अभ्यासाचे निष्कर्ष हे सर्व्हेक्षण पद्धतीतून मिळालेल्या माहितीवर अवलंबून असणार आहेत.

**१३. माहिती संकलनाचे स्त्रोत:-**

प्रस्तुत प्रकल्पासाठी नव्याने साधने शोधून त्याआधारे अभ्यास करण्यात आलेला आहे. त्याकरिता सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.

१. विविध संदर्भ ग्रंथांचा वापर प्रस्तुत अभ्यासासाठी करण्यात आलेला आहे.

२. गूगलवरून प्राप्त झालेल्या विविध छायाचित्रांचा संदर्भ म्हणून वापर करण्यात आलेला आहे.

३. तेर या गावातील उत्खननस्थळी प्रत्यक्ष भेटी देण्यात येवून माहिती गोळा करण्यात आलेली आहे.

# प्रकरण दुसरे :
# तेर येथील उत्खनने

## प्रकरण दुसरे

## तेर येथील उत्खनने

**प्रस्तावना:**

तेर येथे विविध काळात आठ वेळा उत्खनने होऊन तेरच्या इतिहासावर संशोधने करण्यात आली आहेत. मि. हेन्री कझिन्स यांनी इ.स. १९०१ च्या नोव्हेंबरमध्ये तेर या गावाला भेट दिली आणि तेरच्या इतिहासाच्या अवशेषांचा अभ्यास केला. त्यानंतर इ.स. १९२९-३० यावर्षी निजाम सरकारच्या पुरातत्व विभागाने तेरची पाहणी केली. १९६० यावर्षी डग्लस बॅरेट याने तेर येथील मंदिरावर वर्णनात्मक लेखन केले. तेर येथील पांढऱ्या टेकड्यांचे उत्खनन इ.स. १९५८ मध्ये प्रथमच चापेकर व बॅनर्जी यांनी केले. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने डेक महाविद्यालयाच्या मदतीने इ.स. १९५८ साली प्रा. शा. भा. देव व प्रा. पथी यांनी एका टेकडीवर उत्खनन केले. मोरे व डॉ. दीक्षित यांनी १९६७-६८ मध्ये तेर येथे उत्खनन केले. पुरातत्त्वशास्त्र अभ्यासिका डा. माया पाटील यांनीही तेर येथे उत्खनन करून तेरच्या प्राचीनत्वावर प्रकाश टाकला आहे.

निरनिराळया पांढरीच्या टेकडांवर प्राचीन अवशेष मिळणाऱ्या तेरच्या परिसराची व्याप्ती सुमारे सहा चौरस मैल आहे. या परिसरात पाच-सहा पांढरीची टेकाडे आहेत. आज ही प्राचीन पांढरीची टेकडे मोठया प्रमाणात नष्ट होत चालली आहेत. अनेकांनी शेतीसाठी खत म्हणून येथील पांढरीची माती उचललेली दिसते. मोठे खड्डे तेथे दिसतात. शेतीच्या नांगरणीमुळे, दफन भूमीसाठी उपयोग केल्यामुळे, टेकडांवर नवीन घरांच्या बांधणीमुळे मोठया प्रमाणात बाभळीची झाडे उगवल्यामुळे ही पांढरीची टेकाडे नष्टप्राय होत चालली आहेत. तेरणा नदीच्या दोन्ही काठावर ही पांढरीची टेकाडे अस्तित्वात आहेत. त्या परिसरात आजही नाणी, मणी, मातीच्या मूर्ती शंख सापडतात. याच परिसरात जुन्या मोठया आकाराच्या विटा (१६८२ इंच ) सापडल्याचा उल्लेख कझिन्स यांनी आपल्या १९०२ च्या वार्षिक वृत्तांतात केला आहे.

कोटटेकडी व कैकाडी टेकडी भागात घोडयाप्रमाणे दिसणारा नक्षीदार दागिना मिळून आला आहे. यात घोडयाचे तोंड, पाय असे अवयव स्पष्टपणे दिसत आहेत. त्याकाळी गळयातील हा दागिना अलंकार म्हणून वापरला जात असावा. कैकाडी टेकडी भागात उथळ लाल खापराची भांडीही सापडली आहेत. यातील एक भांडे सुस्थितीत बाहेर काढण्यात आले असून इतर भांडीही फुटलेल्या अवस्थेत आहेत. तसेच सातवाहन काळातील तांब्याची नाणी सापडली आहेत. याशिवाय शंखापासून बनविलेल्या बांगडया तुटलेल्या अवस्थेत सापडल्या असून बांगडया बनविण्यासाठी वापरण्यात येणारे शंखाचे काही भाग मिळून आले आहेत.

कोट टेकडीत सापडलेल्या सातवाहनकालीन विट बांधकामाच्या अवशेषाच्या समोरील भागात खोदकाम चालू असताना आणखी एका बांधकामाचे अवशेषही सापडले आहेत. हे बांधकाम विटांचे असून यात पांढऱ्या मातीचा वापर मोठ्या प्रमाणात झाल्याचे दिसते.

**पहिले उत्खनन:**

१९५८ मध्ये पहिल्या प्रथम चापेकर आणि बानर्जी यांनी तेरमधील पांढरीच्या टेकडांचे उत्खनन केले. या उत्खननात सातवाहनकालीन वस्तीचा पुरावा उपलब्ध झाला. विटांनी बांधलेली घरे, सांडपाण्याचे कूप, सातवाहन राजांची नाणी, मातीच्या आणि केओलिनच्या उत्कृष्ट बनावटीच्या स्त्री आणि पुरुषांच्या मूर्ती रंगीबेरंगी दगडांचे आणि काचेचे मणी या उत्खननात सापडल्याने सातवाहन कालीन तेरच्या लोकजीवनाची कल्पना करता आली.

**दुसरे उत्खनन:**

१९६५-६६ मध्ये डॉ. मोरेश्वर दीक्षित यांनी विस्तृत उत्खनन केले. १९६७-६८ ला दीक्षितांनी महाराष्ट्र शासनातर्फे पुन्हा तेर येथील महार टेकडीवर व जवळपासच्या विभागात उत्खनन केले. या उत्खननात मौर्यपूर्वकाळापासून म्हणजे इ.स. पूर्व चौथ्या शतकाच्या आधी ते सातवाहन काळाच्या अखेरपर्यंत (इसवी सन तिसरे शतक) एकूण चार वस्त्यांचा पुरावा हाती आला. पहिल्या वस्तीचे पुरावे मातीपासून बनविलेल्या वस्तू मिळाल्या. दुसऱ्या वस्तीचे मौर्य काळातील झिलईदार निळसर काळया मडक्यांचे अवशेष सापडले आहेत. तसेच मातीची भाजलेली कडी एकावर एक ठेवून तयार केलेल्या सांडपाण्याच्या कुपाच्या स्वरूपात पुरावा मिळाला. तिसऱ्या वस्तीचे रंगीबेरंगी दगडापासून बनविलेल्या मण्यांचे अवशेष सापडले. चौथ्या वस्तीचे सातवाहन कालीन अवशेष सापडले. दगड गोटयांच्या पायावर बहुतांशी मातीच्या भिंतीची घरे, सातवाहन राजांची नाणी (श्री. सातकर्णी, गौतमीपुत्र सातकर्णी, पुलुमावी) सापडली आहेत. मातीची व चिनी मातीच्या उत्कृष्ट मानवी मूर्ती सापडल्या आहेत.

१९६८ च्या उत्खननात मोठ्या आकाराच्या स्तूपाचे आणि अर्धवर्तुळाकृती पृष्ठभाग असलेल्या चैत्यगृहाचे अवशेष या उत्खननात सापडल्याने प्राचीन काळात तेर हे बौध्द धर्माचे मोठे केंद्र होते असे सिध्द झाले. १९६६ च्या उत्खननात आणखी एका बौध्द धार्मिक वस्तूचा पुरावा उघडकीस आला. तेरच्या पश्चिमेस आणि वर उल्लेखलेल्या स्तूपापासून दीड मैल अंतरावर मागील बाजू अर्धगोलाकृती असलेल्या बौध्द चैत्याचे अवशेष अचानक उघडकीस आले. याशिवाय मातीच्या केओलिनच्या व उत्कृष्ट शाडूच्या मूर्ती, नक्षी असलेल्या विटा, सातवाहन राजांची नाणी, विविध आकाराचे मणी, त्याचप्रमाणे सातवाहन कालीन काळी आणि तांबडी मडकी, दागिने बनविण्याचे दगडी साचे, कर्णभूषणे, बांगडया, पदके इत्यादी अवशेष सापडले.

**तिसरे उत्खनन:**

१९७५ च्या उत्खननात मातीच्या मुर्तीप्रमाणेच सातवाहन राजांची नाणी, मणी व इतर विविध वस्तू सापडल्या. परंतू या उत्खननात सर्वात महत्वाचा पुरावा प्राचीन तेरच्या भोवती निर्माण केलेल्या लाकडी तटबंदीच्या स्वरूपातील होता. प्रचंड आकाराचे लाकडी खांब आडवे उभे लावून इ.स. पूर्व पहिल्या दुसऱ्या शतकामध्ये ही तटबंदी निर्माण करण्यात आली होती. सातवाहनांच्या राज्यांत ३० तटबंदीयुक्त नगरे होती असा प्लिनी या प्रवाशाने केलेला उल्लेख महत्वाचा ठरतो.

**तेरमधील उत्खनने:**

१. पांढरीचे टेकाड ( १९५८ ) :- चापेकर व बॅनजी डेक्कन कॉलेज पुणे, पुरातत्त्व विभाग, महाराष्ट्र शासन (डॉ. मोरेश्वर दीक्षित पुरातत्त्ववेत्ते).
२. रेणुका टेकडी ( १९६५-६६ ) :- डॉ. मोरेश्वर दीक्षित पुरातत्त्व विभाग , महाराष्ट्र शासन.
३. महार टेकडी ( १९६७-६८ ) :- डॉ. मोरेश्वर दिक्षित पुरातत्व विभाग महाराष्ट्र शासन.
४. कोट टेकडी ( १९७५ ) :- प्रा. पथी, प्रा. शांताराम देव, मराठवाडा विद्यापीठ , औरंगाबाद.
५. काझी टेकडी - कोट टेकडी ( १९८३-८४ ) :- पुरातत्त्व विभाग औरंगाबाद , महाराष्ट्र शासन.
६. प्रदीप व्यास यांचे शेतात सर्वे नं. १४२ १९८७-८८.
७. भातमागे यांचे शेत सर्वे नं. ४०६/२ १९८९-९०.
८. कोट टेकडी, वैराग टेकडी, कैकाडी टेकडी २०१४-१५ डॉ. माया पाटील, पुरातत्त्व विभाग, वस्तुसंग्रहालये संचालनालय.

# प्रकरण तिसरे : तेरचा इतिहास

# प्रकरण  तिसरे

# तेरचा इतिहास

## तेरचा इतिहास:

ताकारपद, तगर, तगरपुर तेरापुर, थेर अशा विविध नावांनी प्राचीन काळी ओळखल्या जाणाऱ्या उस्मानाबाद पासून २४ कि.मी. अंतरावर तेर या तेरणा नदीच्या तीरी वसलेल्या या नगराची प्रसिद्धी प्राचीन काळी रोमन साम्राज्या पर्यंत होती. याची अनुभुती या संपन्न व वैभवशाली इतिहासाचा धनी असलेल्या गावाला भेट देवून होते. प्राचीन काळात तगरला उपराजधानीचा दर्जा होता व त्याची व्याप्ती इतकी विस्तृत होती की आजच्या तेर वरुन त्याची कल्पना करता येणार नाही. प्रतिष्ठान प्रमाणेच तेर देखील सातवाहनांच्या काळात दक्षिणपथावरील भरभराटीस आलेले नगर होते. तेर येथे उत्खननात सर्वात खालच्या थरात सापडलेल्या गुळगुळीत दगडी हत्यारावरुन येथे नवाश्मयुगात देखील मानवी वस्ती होती हे सिद्ध होते (इ.स.पू. ९५०० ते इ.स.पू. ९०००)

तेर महात्म्य (इ.स. १७५७) या स्थानिक हस्तलिखीतात महाकाव्य कालिन तेर च्या अस्तीत्वावर कांही अंशी प्रकाश पडतो. बौद्ध वाङ्मयात उल्लेखिलेल्या षोडस महाजनपदांपैकी अश्मक व मूलक ही दोन जनपदे मराठवाडयात होती. त्यापैकी तगरचे स्थान अश्मक जनपद होते. (इ.स.पू. ६००). तगर चा सर्वात प्राचीन उत्कीर्ण उल्लेख अशोकाच्या सांची स्तुपावरील कोरीव लेखात ताकारापद असा आढळतो. मौर्यकालिन (इ.स.पू. ३०० ते इ.स.पू. २००) नाणी व खापरे तेर येथील उत्खननात उपलब्ध झाल्यामुळे मौर्य काळात तगर ची भुमीका स्पष्ट होते. सातवाहन कालिन तेर चा पुरातत्वीय वारसा महान आहे. तेर च्या व्यक्तीमत्वाचा खऱ्या अर्थाने अविष्कार करणारा काळ म्हणजे सातवाहन काळ होय हा तेरच्य इतिहासातील महत्वपूर्ण व विस्ताराने मोठा कालखंड मानला जातो. आज तेर परिसरात कोठे ही खणले तरी या काल खंडाचे अवशेष सापडतात. सातवाहनांची राजधानी प्रतिष्ठान बरोबरच तगर, भोगवर्धन ही समकालिन शहरे होती. प्रतिष्ठान खालोखाल तगरचे स्थान महत्वपूर्ण होते. पेरिप्लस चा ग्रंथकर्ता व टॉलेमी या ग्रीक ग्रंथकाराने दक्षिणेतील कापड उत्पादनातील प्रमुख केंद्र म्हणून तगर चा उल्लेख केला आहे. तेर येथे आढळलेल्या रोमन वसाहतींचे अवशेष तसेच महाकुंभ, जाती, दिवे, नाणी, रेड पॉलिश वेअर व इतर अन्य अवशेष यावरुन तेर व रोम यांचे घनिष्ट संबंध होते हे स्पष्ट होते. सातवाहन कालखडातील राजांची अनेक नाणी तेर येथे सापडली आहेत. यात प्रामुख्याने इ.स. १९५८ च्या उत्खननातील सापडलेल्या नाण्यावर सातकणीस ही ब्राम्ही अक्षरे

आढळुन येतात तर इ.स. १९६७-६८ च्या उत्खननात वशिष्ठीपुत्र पुळुमावी चे नाणे सापडले आहे. त्याच बरोबर इ.स. १९८६ मध्ये सापडलेल्या ब्राम्ही शिलालेखावर वशिष्ठीपुत्र पुळुमावी या सातवाहन राजाचा उल्लेख स्पष्टपणे दिसून येतो या शिलालेखात सातवाहन सम्राट वशिष्ठीपुत्र पुळुमावी याच्या १० वर्षाच्या कारकिर्दीचा उल्लेख आहे. (इ.स. 145-15१४५-१५५)

इ.स. ६१२ च्या हैदराबाद ताम्रपटात पुलकेशी द्वितीय या चालुक्य राजाने तगरनिवासी जेष्ठशर्मन नावाच्या ब्राम्हणाला दरबारी बोलावून सन्मान करुन दान दिल्याचा उल्लेख आढळतो. या ताम्रपटात तेर चा तगर व तेरणा नदीचा तगरा असा नामोल्लेख आहे. तेर येथील त्रिविक्रम मंदिरातील चालुक्यकालिन विष्णूमूर्ती तेरची कला, शिल्पकलेतील वाटचाल दर्शविते. (इ.स. ५४३ ते इ.स. ७५३). विदर्भातील राष्ट्रकुट राजा नन्नराज उर्फ युद्धासुर याच्या इ.स. ८९३ मधील सांगळुद ताम्रपटात उम्बरिकाग्राम व वटपुरग्राम या दोन खेडयातील जमीन तगरनिवासी हरगण द्विवेदी यास दान दिल्याचा उल्लेख येतो. या राजाच्या दुसऱ्या ताम्रपटात वरमुलक पंडित या ब्राम्हणाचा तगर रहिवाशी असा उल्लेख आहे. त्रिविक्रम मंदिरात सापडलेली कार्तिकेयाची अप्रतिम मूर्ती राष्ट्रकुटकालिन असल्याचे सिद्ध होते. तेर येथे कलचुरी घराण्याचे दोन शिलालेख सापडले आहेत. पैकी पहिला लेख कानडी भाषेत असून तो त्रिविक्रम मंदिरात सापडला यात कल्याणीचा कलचुरीय नृपती महामंडलेश्वर जोगमरस च्या कारकिर्दीत वरिमल्लोज नावाच्या शिल्पकाराच्या मुलाने काळभैरवाची मूर्ती बनवून तीची प्रतिष्ठापना केल्याचा उल्लेख आहे. इतिहास संशोधक ग.ह. खरे यांनी याचा कालखंड शके १००० च्या आसपास दर्शविला आहे. दुसरा शिलालेख शके ११६० सालातील असून तेर येथील देवालयाला दान दिल्याचा उल्लेख या शिलालेखात मिळतो. लेखाचा पूर्वभाग झिजल्यामुळे कोणत्या राजाच्या राजवटीचा निर्देश आहे हे कळत नाही. परंतू जोगमरस याचा नातु विज्जण किंवा बिज्जल हा शके १०६७ ते १०८९ या काळात गादीवर होता. प्रस्तुत लेखाचा काळ शके १०८६ मध्ये कल्याणीचा विज्जण किंवा बिज्जल याची सत्ता असेल तर त्याच्या राजवटीत ठरतो. कल्याणीच्या चालुक्य घराण्यातील सर्वात पराक्रमी राजा विक्रमादित्य सहावा याच्या काळातील तेर परिसरात दानपत्रे उपलब्ध झाली असून त्यात तेर परिसरातील रहीवाश्यांचे उल्लेख आढळतात. यातील अनदुर (उस्मानाबाद) महामंडलेश्वर इंद्रस या अधिकाऱ्याचा उल्लेख तगर च्या शिलाहारांचा वंशज असा आला आहे.

शिलाहार घराण्याच्या (इ.स. ९९७) तीन प्रमुख शाखांपैकी उत्तर कोकण व कोल्हापुर ही दोन घराणी आपले पुर्वज प्रारंभी तगर नामक सुंदर नगरात राज्य करित होते. असे अभिमानाने निर्देशीत करतात. तगर ही शिलाहारांची मूलभुमी होती हे त्यांच्या शिलालेखातील तगरनगरभूपालक, तगरपूरवराधिश्वर, तगरपुरपरमेश्वर या बिरुदावरुन हे जाहीर होते. इ.स.

१२ व्या शतकातील जुन्या मराठी भाषेतील एका लेखातील उद्यापनाच्या कार्यक्रमात दान दिल्याचा उल्लेख आहे. इ.स. १३१३ मधील लेख जैनमंदिरातील पार्श्वनाथाच्या सिंहासनावर आहे. यादव राजा रामराजाची नाणी आजही तेर परिसरात पहायला मिळतात. (इ.स.८५० ते इ.स. १३३४).

यादव काळात होवून गेलेले वैराग्यमहामेरु थोर संत गोरोबा काका हे भक्तीपंथाचे अध्वर्यु असून अध्यात्मात त्यांचा अधिकार श्रेष्ठ होता. म्हणून तेर ला गोरा कुंभाराचे तेर असे म्हणतात. इ.स. १४ व्या शतकाच्या प्रारंभी अल्लाउद्दीन खिलजीने हा प्रदेश जिंकल्याने तेर इस्लामी सत्तेच्या अंकित बनले तेर वर बहामनी, अहमदनगरची निजामशाही, विजापुरची अदिलशाही औरंगजेब यांनी राज्य केले. इ.स. १५९८ चा एक लेख जैनवस्तीत सापडला असून तो नागरी लिपीत आहे. यात तैर किंवा तेर या ग्रामनामाचा उल्लेख आहे. कझिन्स यांना इ.स.१६५९ सालचा पर्शियन भाषेत लिहिलेला एक ताम्रपट सापडला त्यात काझीचे अधिकार कायम ठेवलेले आहेत. मिर्झाराजा जयसिंह शिवाजी राजांवरील स्वारीच्या वेळी मोगल लष्करासहित तेरणा नदीच्या काठी तेर च्या आसपास ५ जानेवारी १६६६ रोजी मुक्कामास होते, असा उल्लेख जिल्काद या ग्रंथात नमुद केलेला आहे. हैद्राबाद मुक्तीसंग्रामानंतर १७ सप्टेंबर १९४८ रोजी तेर स्वतंत्र भारतात विलीन झाले. संयुक्त महाराष्ट्र चळचळीत इ.स. १९६० मध्ये मराठवाडा महाराष्ट्रात समाविष्ट झाला आणि तेर ही महाराष्ट्रात सामील झाले.

**तगर चा शोध:**

पेरिप्लसच्या ऑफ इरिथ्रीयन सी या ग्रीक खलाशाने इ.स. ५० ते १०३ च्या दरम्यान लिहीलेल्या प्रवासवर्णनात बॅरिगाझा (गुजराथेतील भरुच-भडोच) पासून दक्षिणेस २० दिवसाच्या प्रवासाने पैठण येते. पैठणपासून पूर्वेस दहा दिवस प्रवास केल्यानंतर तगरला पोहचता येते. असे सांगितले. अलेक्झांड्रीयन भुगोलतज्ञ टॉलेमी (इ.स. दुसऱ्या शतकाचे दुसरे चतुर्थक) म्हणतो तगर ही नगरी समुद्र किनाऱ्या पासून आत अरियके या प्रदेशात आहे. व सिरी टॉलेमाओस (सातवहन घराण्यातील श्री पुळुमावी) या राजाची राजधानी बैथन (पैठण) च्या ईशान्येस आहे. अशा उल्लेखामूळे तगर च्या स्थल निश्चिती विषयी तज्ञांमध्ये मतभेद होते. कारण तेर हे नाव या गावाला १६ व्या शतकात लाभलेले होते. त्यामुळे प्राचीन तगर कोणते, तेर हेच प्राचीन तगर आहे का? या संभ्रमात इतिहास संशोधक बराच काळ राहिले. याचा पेच सोडव ण्याचा प्रयत्न ब्रिटीश काळात सुरु झाला. विविध तज्ञांनी तगर नगरीचे गुढ स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला.

१. विलफोर्ड, व्हिन्सेंट मॅनर्ट व रिटेर यांनी दौलताबाद जवळील देवगड म्हणजे तगर असे प्रतिपादीत केले.

२. पंडित भगवान लाल इंद्रजींनी तगर म्हणजे जुन्नर असे सांगीतले. त्यांनी तगर म्हणजे त्रिगीरी (तीन टेकडया) यावरुन तगर हे नाव निर्माण झाले असावे असे सांगितले. जुन्नर जवळ असलेल्या तीन टेकडया व त्यामध्ये असणाऱ्या बौद्ध लेणी यावरुन जुन्नर हेच तगर असावे अशी मांडणी केली.
३. इतिहासाचार्य राजवाडे यांनी कनकगिरी पासून ६ कोसावर असणारे तावरगेरे, तावसगीरी हेच तगर असावे असे म्हटले.
४. ग्रेड डफ यांनी बीड अथवा बीड जवळील परिसर म्हणजे तगर असे प्रतिपादन केले.
५. रामकृष्ण भांडारकर यांनी पैठण च्या अग्नेयेस ७० मैलावर असणाऱ्या धारुर शी तगर चा संबंध जोडला.
६. डॉ. फ्लिीट यांनी कोल्हापूर किंवा करवीर म्हणजे तगर असे मत मांडले. परंतू नंतर आपले मत बदलुन तगर चा त्यांनी तेर शी संबंध स्पष्ट केला. त्यास त्यांनी भाषा शास्त्राचा आधार दिला. भाषा शास्त्रानुसार नगर चे नयर नयरचे नेर अथवा नर होते. जुन्नेर पासून जुन्नर व संगमनगर पासून संगमनेर होते. यास डॉ. बार्नेट यांनी देखील मान्यता दिली.
७. इ.स. १९०१ च्या नोव्हेंबर महिन्यात मी. हेन्री कझिन्स यांनी तेर ला भेट दिली. त्यांनी येथील त्रिविक्रम मंदिर, उत्तरेश्वर मंदिराची लाकडी चौकट, स्तुपाचे भग्नावशेष जैन मंदिराजवळील बौद्ध अवशेष, शिलालेख, टेकाडावरील सापडलेले सापडलेले अवशेष या गोष्टींकडे विद्वानांचे लक्ष वेधले. गावच्या दक्षिणेस भिंत (तटाचे) अवशेष आढळले. प्लीनीने उल्लेख केलेल्या सातवाहनकालिन नगरांमध्ये तेर चा समावेश होवू शकतो. असे त्यांनी प्रतिपादन केले. त्यांनी १९०२-०३ च्या भारतीय पुरातत्व सर्वेक्षण खात्याच्या वृत्तांतामध्ये तेर चे विस्तृत विवेचन केले आहे. कझिन्स यांच्या संशोधनामुळे तगरच्या स्थान निश्चितीत असणाऱ्या सर्व शंकांचे निरसण झाले. पेरिप्लस व टॉलेमी यांनी उल्लेखलेले तगर म्हणजेच तेर यामध्ये कोणतेही दुमत उरले नाही.
८. आजपर्यंत तेर मध्ये एकूण आठ उत्खनने झाली आहेत. त्यातुन तेर च्या इतिहासाचे व तेरच्या वैभवाचे अनेक पैलू प्रकाशात आले आहेत. ते काम अजून चालु आहे. व पुढेही अव्याहतपणे चालुच राहील.

**सातवाहन काळात तेरची भरभराट:**

सातवाहन काळात 'तेर' हे बौद्ध धम्म व जैन धम्माचे प्रमुख केंद्र होते. १९६८ च्या उत्खननावरून तेर हे बौद्ध धम्माचे प्रमुख केंद्र असल्याचे सिद्ध झाले आहे. सम्राट अशोकाच्या नंतर दक्षिण पथावर इ. स. पूर्व दुसऱ्या शतकात सातवाहनांनी सत्ता काबीज केली. तेर नगरीचा

तो खऱ्या अर्थाने सुवर्णकाळ होता. तेव्हा तेरचा विस्तार मोठा होता. ते उत्तर दक्षिण पथाशी जोडले होते. सातवाहनकालीन व्यापाऱ्यांचे ते प्रसिद्ध व्यापार केंद्र होते. सातवाहनाची 'तेर' ही उपराजधानी होती. तेर हे सातवाहन काळात दक्षिणपथातील कापड उत्पादनाचे एक प्रमुख व्यापारी केंद्र होते. सातवाहन घराण्यातील राजा सातकर्णी, गोतमीपुत्र सातकर्णी व शिष्ठीपुत्र पुलुमावी व यज्ञश्री सातकर्णी या पराक्रमी राजांनी तेरची भरभराट केली होती. तेर येथे सातवाहनकालीन १. बौद्ध स्तूप, २. वर्तुळाकार बौद्ध स्तूप ३. त्रिविक्रम मंदिर-बौद्ध चैत्यगृह सापडले आहे. सातवाहन काळात तेर येथे बौद्ध 'थेरं ' मोठ्या संख्येने राहात होते. त्यांना राहण्यासाठी तेर येथे बौद्ध विहार, चैत्य व स्तूप निर्माण केले होते. तेरचे नावच 'थेर'वरून 'तेर' झाले आहे. तेर हे इ.स. पूर्व दुसऱ्या शतकात सातवाहन राजाच्या काळात बौद्ध धम्मप्रसारोच प्रमुख केंद्र होते. व्यापारासोबतच तेरमधून बौद्ध धम्माचा प्रसारही मोठ्या प्रमाणावर होत होता. तेर येथील उत्खननात खालील बौद्ध स्तुपांचे अवशेष सापडले आहेत.

**व्यापारी मार्गावरील प्रसिद्ध व्यापारी बाजारपेठ तेर:**

समुद्रालगतच्या प्रदेशातून व्यापारी माल नगर व पैठण येथील बाजारपेठेत येत असे. तेथून तो सर्वत्र रवाना होत होता. दक्षिणपथात आंध्रप्रदेशातील मसुलीपट्टनम व विनुकोंडा येथून हा व्यापारी मार्ग हैद्राबाद-कल्याण-तेर-पैठण-दौलताबाद-नाशिक-भडोच असा होता. 'तगर' दक्षिण-उत्तर व्यापारी मार्गाने जोडले होते. संपूर्ण देश विदेशाशी नगरहून व्यापार चालत होता. प्रसिद्ध व्यापारी तगरमध्ये येत होते. ते तेथील बौद्ध स्तुपास धम्मदान देत असत.

**तेर आणि राजकीय स्थित्यंतरे:**

बौद्ध वाङ्मयातील उल्लेखानुसार 'सोळा' महाजनपदापैकी 'अश्मक' व 'मूलक' ही दोन जनपदे मराठवाड्यात होती. त्यात 'तगर हे अश्मक राज्यात होते. मौर्यकाळात सम्राट अशोकाने बांधलेल्या सांची स्तुपावरील लेण्यात 'तारकापद' या ग्रामनामाचा उल्लेख केलेला आहे. म्हणजेच बुद्धकाळात व सम्राट अशोकाच्या मौर्यकाळात दक्षिणपथात 'तेर-तगर-तारकापद' हे एक महत्त्वाचे व्यापारी केंद्र होते. तेरवर मौर्य, सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकुट, कळचूर्य, शिलाहार, यादव, खिलजी, बाहमनी, औरंगजेब, निजाम इत्यादी राजांनी राज्य केल्याचे इतिहास सांगतो. सोळा महाजनपदांपासून ते भारतीय स्वातंत्र्यकाळापर्यंत 'तेरचा' इतिहास तेरचे ऐतिहासिक महत्त्व स्पष्ट करतो. 'तेर' नगरीला समृद्ध व वैभवशाली ऐतिहासिक वारसा आहे.

**तेरच्या समाजजिवनाचा कालखंड:**

तेर मध्ये झालेल्या राजवटी, समाजजीवन यांचे वर्गीकरण येथे झालेल्या उत्खननाच्या सहाय्याने वेगवेगळया कालखंडात करण्यात आलेले आहे. त्याचे एकूण पाच कालखंड पडतात. ते खालील प्रमाणे.

**१. कालखंड पहिला:**

तेरच्या पहिल्या वस्तीचा कालखंड हा डॉ. मोरेश्वर दिक्षितांच्या उत्खननानुसार इ.स. पूर्व ४०० ते २०० म्हणजे मौर्यपूर्व व मौर्यकालखंड असा ठरतो. या कालखंडातील वस्तीचा नाश पुरामुळे झाला असे दिक्षित म्हणतात.

**२. कालखंड दुसरा:**

या कालखंडाला पूर्व सातवाहन काळ असे म्हणतात. या काळातील घरे आकाराने मोठी, एकापेक्षा जास्त खोल्या असलेली, विटांच्या बांधणीची, घरातील सांडपाणी वाहून जाण्यासाठी मातीची भाजलेली कड़ी एकावर एक ठेवून सांडपाण्याचे कूप बनविले जात. या वस्तीचा नाश आगीमुळे झाला असावा. १९७५ यावर्षी डॉ. देवांनी केलेल्या उत्खननात तत्कालीन वस्तीभोवती लाकडी तटबंदी होती असा पुरावा मिळालेला आहे.

**३. कालखंड तिसरा:**

या कालखंडास उत्तर सातवाहन कालखंड असे म्हणता येईल. याचा काळ इ.स. पहिले/दुसरे ते तीसरे शतक असा सांगता येईल. तेर च्या इतिहासातील हा सुवर्णकाळ होय. या काळात तेर हे बौद्ध धर्मीयांचे केंद्र म्हणून प्रसिद्ध झाले होते. तर विविध कलाकुसरीचा उदय होवून विविध मणी, कर्णभूषणे, मातीच्या व केओलिनच्या उत्कृष्ठ मूर्ती सातवाहन राजांची नाणी. स्त्री मूर्ती, अलंकार, साचे, हस्तीदंती मुठी इत्यादी वस्तूंची निर्मीती होत असे. या काळात आयात-निर्यात वाढली. पश्चिम किनाऱ्यावरील बंदरातून येणाऱ्या विविध रोमन बनावटीच्या वस्तुंनी तेरचे समाजजीवन व्यापुन टाकले होते. रोमन दिवे, अलेक्झांड्रीयन कारागीरीचे ब्रांझ आरसे, रोमन काचसामान इत्यादी वस्तु या कालखंडातील व्यापार उदीमाची त्याप्रमाणे संपन्न जीवनाची साक्ष देतात. यामुळे या काल खंडातील घरे आकाराने मोठी दगड गोटयांच्या भक्कम पायावर बांधलेली व कौलांनी शाकारलेली अशा स्वरुपाची होती. इ.स. च्या तिसऱ्या शतकातील पहिल्या चतुर्थकाच्या शेवटी सातवाहनांचा अस्त झाल्यानंतर तेर चे वैभव कांही अंशी कमी झाले. सातवाहनांच्या अस्ताबरोबर तिसऱ्या शतकाच्या सुरवातीस तेरचे वैभव लयास गेले.

**४. कालखंड चौथा:**

स्थूलमानाने हा कालखंड गुप्त-चालुक्य असा निर्देशीत करता येईल. प्रत्यक्ष गुप्तांची सत्ता तेर ला नसली तरी तेर येथे सापडलेल्य कांही मृण्मयी मूर्ती गुप्त शैलीच्या असून त्रिविक्रम मंदिर, त्याचप्रमाणे उत्तरेश्वर मंदिर ही या कालखंडाची दिशादर्शके मानता येतील.

**५. कालखंड पाचवा:**

हा कालखंड मध्ययुगाचा मानता येईल. तेर येथे सापडलेली शिलाहार कालीन शिलालेख आणि या नंतरच्या सोळाव्या-सतराव्या शतकातील लेख व यानंतरच्या काळातील जैन मंदिरे हे पुरावे देता येतील. हेमाडपंती शैलीची नवरंगी शिवालय गावाबाहेरील पश्चिमेस असणारे नागठाण आणि पार्श्वनाथ बस्ती यांचा यात समावेश होतो. शिलाहार राजांनी आपल्या अनेक लेखात आपले मुळ ठिकाण तेरनगर असल्याचे नमुद केले आहे. कदाचित शिलाहाराची पहिली शाखा तगर (तेर) येथे राज्य करीत असावी. पुढील काळात शिलहारांच्या काही शाखांची उत्तर कोकण, दक्षिण कोकण आणि कोल्हापूर भागात आपल्या राजवटी स्थापन केल्या होत्या.

**थोडक्यात इ.स.पूर्व 300 ते इ.स. 16 व 17 वे शतक एवढया मोठया कालखंडात तेरला वस्ती होती. म्हणून तेरला आज ऐतिहासिकदृष्टया व संशोधनाच्या दृष्टीकोनातून महत्व प्राप्त झाले आहे. या सर्वातून तेरचे प्राचीनत्व स्पष्ट होते.**

# प्रकरण चौथे :
# तेरमधील प्राचीन अवशेषांचा अभ्यास

# प्रकरण चौथे

# तेरमधिल प्राचीन अवशेषांचा अभ्यास

तेरणा नदीकाठी दक्षिण तीरावर वसलेले 'तेर' हे बौद्ध धम्माच्या अवशेषांनी समृद्ध आहे. 'सातवाहन' काळात ते फार मोठे वैभवशाली व्यापारी केंद्र होते. त्याचा विस्तार खूप मोठा होता. तेरच्या सभोवती लाकडी तटबंदी होती. दक्षिणेतील महानगरात सोपारा, जुन्नर, पैठण व तेर ही प्रसिद्ध नगरे होती. सातवाहनांची ही 'उपराजधानी' होती. इ. स. पूर्व दुसऱ्या शतकात सातवाहनांची 'तेवर' सत्ता होती. बौद्धप्रेमी सातवाहनांनी 'तेर' येथे अनेक बौद्ध स्तूप बांधले होते. त्यातील आता एका 'चैत्याचे' 'वर्तुळाकर व 'अर्धवर्तुळाकार स्तुपाचे' अवशेष सापडले आहेत. प्राचीन काळी तेरचा विस्तार मोठा होता. दक्षिण भारतातील व्यापाराचे ते मोठे केंद्र होते. त्याचे प्राच्यावशेष आजही तेरणा नदीच्या दोन्ही काठांवर पांढऱ्या मातीच्या टेकाड्यांच्या स्वरूपात शाबूत आहेत. तेथे उत्खनन केल्यास प्राचीन तेरच्या इतिहासाची पाने आणखी उलगडली जातील आणि तेरचा समृद्ध इतिहास समजून घेता येईल.

तेर येथील पांढऱ्या मातीच्या टेकड्यांतील उत्खननात सातवाहनकालीन नाणी, जाते, रथाचे दगडी चाके, मणी, अलंकार, मातीची भांडी, उसे, शिलालेख, वरवंटे, दगडी पाटे, सांडपाणी कूप, विटा, घरे, स्त्री-पुरुषांच्या मूर्ती, रांजण, मणी, कर्णभूषणे, अलंकार, हस्तिदंत हाडांच्या वस्तू, शंख वस्तू, प्राण्यांच्या मूर्ती, लज्जागौरी, दिवे व प्रतिमा या वस्तू सापडल्या आहे.

**संत गोरोबा काकांचा मठ:**

आज तेरला संत गोरोबा काकांचे तेर म्हणून ओळखले जाते. वारकरी संत परंपरेतील संत गोरोबा काका हे अग्रगण्य संत होऊन गेले. ते तेरचे रहिवासी होते. तेर येथे त्यांचे घर निवासस्थान आजही आहे. संत गोरोबा काकांचे अभंग प्रसिद्ध आहेत. तेरणा नदीकाठी गोरोबा काकांचा मठ आहे. तेथे त्यांची 'समाधी' आहे. तेथे विविध कार्यक्रम-उत्सव साजरे केले जातात. या समाधी परिसरात आता विविध सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. असे हे 'थेर' आज विविध धर्मपंथांचा वारसा जतन करणारे एक ऐतिहासिक 'नगर' म्हणून अस्तित्वात आले आहे.

**स्तुप अवशेष:**

इ.स. १९६८ यावर्षी तेर येथील महार टेकडीवर व आसपासच्या भागात डॉ. मोरेश्वर दिक्षीत यांनी उत्खनन केले होते. या उत्खननात प्रचंड स्तुपाचे अवशेष सापडले आहेत. हा स्तुप सध्या

अस्तीत्वात नाही. परंतू त्याच्या अवशेषावरुन स्तुपाची रचना समजुन येते. हा स्तुप चक्राकार व पक्क्या विटांचा बांधलेला आहे. त्याची वैशिष्टे खालील प्रमाणे आढळुन आली.

१. स्तुपाचे बांधकाम विटांचे व व्यास २६ मीटर होता.

२. स्तुपाची बांधणी मोठया चक्रात लहान चक्र अशी असून मोठया चकाला १६ व आतील लहान | चकाला ८ आरे होते. आतील चकाच्या मध्यभागी नाभिस्वरुप चौरस रचना असून ती विटांच्या ३४ थरांनी उभारलेली होती.

३. वर्तूळाचा परिघ व केलेले आरे या मधील जागा माती टाकून भरलेली होती.

४. स्तुपाचे बाहेरील वर्तूळाच्या पुर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तर या चार दिशांना अनुसरुन ५ मीटर लांबीचे व दिड मीटर रुंदीचे चबुतरे विटांनी बांधलेले होते. या प्रत्येक चबुतऱ्यावर अयाक स्तंभ उभारण्याची पद्धत होती.

५. स्तुपाचे बाहेरील वर्तुळ ५.३० मीटर रुंदीचे असून त्या बाहेरील बांधकाम विटांचे आहे.

६ स्तुपाच्या घुमटाचा बाहय किंवा दर्शनी भाग शिल्पांनी अलंकृत केलेल्या फरशांनी मढवलेला असावा.

७.स्तुपाच्या बाहयभागा प्रमाणेच स्तुपाभोवतालच्या प्रदक्षिणेच्या मार्गावर फरशा बसवलेल्या होत्या.

८. स्तुपाच्या घुमटाचे २९ थर शाबुत अवस्थेत उत्खननात आढळले.

स्तुप उध्वस्त झालेला असल्याने धातु किंवा पवित्र अवशेष ठेवलेला करंडक सापडला नाही. मात्र इतरत्र स्फटीक, पुष्पराग, इत्यादी दगडाचे मणी आढळले ते मंजूषेत इतर अवशेषा सोबत ठेवलेले असावेत स्तुपाभोवती असलेल्या प्रदक्षिणापथात पुळुमावी या राजाचे नाणे सापडले या स्तुप बांधणीचा काळ इ.स. १२० ते इ.स. १४० असा ठरतो. इतर सातवाहन राजांप्रमाणेच पुळुमावी ने या स्तुप उभारणीत सकीय सहाय्य केले असावे. दुर्दैवाने या विटकरी शेतातुन अनेकांनी विटा नेल्यामुळे | अवशेषांचा ठावठिकाणा राहिला नाही. असे असूनही हा स्तुप महत्वाचा मानावा लागतो. या स्तुपाची रचना शैली आंध्र शैली समान वाटते.

**तेर मधील पांढरीची टेकाडे:**

तेर आज ही उंच अशा पांढरीच्या टेकाडावर वसलेले आहे. तेरणा नदीच्या दोन्ही बाजूला अनेक पांढरीची टेकाडे आपल्या उदरात पुर्वजांच्या वैभवशाली वारश्याच्या पाऊलखुणा सामावून स्थीत होती. परंतू कालौघात नागरी करणाच्या वाढीमुळे अनेक पांढरीची टेकाडे नष्ट

झाली. शेतजमीनीसाठी सपाटीकरण करणे, तेरच्या परिसरातील अनेकांच्या शेतजमीनी सुपिक करण्याकरता या पांढरीच्या टेकाडांचा उपयोग करण्यात आला. अशा प्रकारे मानवी त्याच बरोबर नैसर्गिक कारणामुळे ही टेकाडे नष्ट होत गेली. तरीही आज महार टेकडी, कोट टेकडी, मुलाणी टेकडी, रेणूका टेकडी, बैराग टेकडी, सुलेमान टेकडी, काझी टेकडी, गोदावरी टेकडी, या टेकडया तेरच्या प्राचीन वैभवशाली गत इतिहासाच्या पाऊलखुणा उदरात सामावुन स्थीत आहेत.

पुरातत्वज्ञ एखादे विशिष्ट टेकाड किंवा विशिष्ठ जागा उत्खननासाठी कशी हेरतात असा उत्खनन पाहण्यास  येणाऱ्या किंवा सामान्य अभ्यासकास प्रश्न पडतो. आज जशा अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या मुलभुत गरजा आहेत. त्याचप्रमाणे पूर्वी पाणी ही मानवाची सर्वात महत्वाची गरज होती. ज्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता आहे. अशा ठिका णी मानव वसाहत करुन राहत असे. प्राचीन काळी घरे बहुतांशी मातीची बांधली जात अशा वस्त्या एकावर एक झाल्याने कालांतराने वस्त्यांच्या पडझडीमुळे त्या अवशेषांचे एक पांढरीचे टेकाड निर्माण होते. शेतातील इतर काळया व करड्या मातीपेक्षा पांढरीच्या टेकाडांचा रंग वेगळा असतो. पांढरीची टेकाडे याचा अर्थ प्राचीन वस्तीचे अवशेष असलेले टेकाड होय. तेर’ हे तेरणा नदीच्या काठी पांढरीच्या टेकाडावर वसलेले आहे. तेरणा नदीच्या दोनही बाजूस अनेक पांढरीची टेकाडे आहेत. ही टेकाडे आपल्या पूर्वजांचा वारसा सांभाळत आहेत. नागरीकरणामुळे शेतजमिनीसाठी ही पांढरीची टेकाडे शेतजमिनीत रूपांतरीत करण्यात आली. त्यांचे सपाटीकरण करण्यात आले, त्यामुळे ही टेकाडे नष्ट करण्यात आली आहेत. तरीही ‘तेर’मध्ये महार टेकडी, कोट टेकडी, मुलाणी टेकडी, रेणुका टेकडी, बैराग टेकडी, सुलेमान टेकडी, काझी टेकडी व गोदावरी टेकडी या टेकड्या तेरच्या प्राचीन वैभवशाली इतिहासाच्या पाऊलखुणा आपल्या उदरात स्थित आहेत. पांढरीचे टेकाड म्हणजे प्राचीन वस्तीचे अवशेष असलेले टेकाड असते. अशी पांढरीचे टेकाडे तेरमध्ये अनेक ठिकाणी आहेत. तेरमधील पूर, आगी व भुकंप यामुळे तेरनगर काळाच्या पडद्याआड गेले. तेरचा इतिहास झाकला गेला. त्यावर पांढरीच्या टेकाडांचा भूगोल तयार झाला. अशा टेकाड्यांचे उत्खनन केल्यास, तेथे तेरच्या प्राचीन इतिहासाचे अवशेष सापडतात. तेरचा इतिहास पुन्हा जिवंत होतो. तो नव्याने उलगडला जातो. म्हणून तेरची पांढरीची टेकाडे ही तेरच्या इतिहासाचे अवशेष आहेत. त्यात तेरचा इतिहास दडलेला आहे. तो आपण जतन केला पाहिजे. त्यांचा शोध घेतला पाहिजे.

ज्या ठिकाणी पाणी व जीवन उपयोगी साधने विपुल प्रमाणात असतील त्या ठिकाणी मानवी वस्त्या जास्त वेळा | निर्माण होतात. व त्याच ठिकाणी पांढरीची टेकाडे जास्त विस्तृत व ऊंच असतात. तेर येथे विस्तृत प्रमाणात पांढरीची टेकाडे आढळुन येतात. पुरातत्वज्ञांच्या मते कालौघात तेरणेच्या पुराने, अकस्मात लागलेल्या आगीने, भुकंपाच्या हादऱ्याने तगर ही

वैभवशाली नगरी काळाच्या पडदयाआड गेली. या संस्कृतीच्या पाऊलखुणा, इतिहास झाकला गेला आणि त्यावर पांढरीच्या टेकाडांचा भुगोल चढला. सामान्य माणसास प्रश्न पडतो की संशोधक या स्थळांचा शोध कसा घेतात. अशा उत्खनन स्थळाचा शोध घेण्यासाठी पुरातत्वज्ञ कांही सामान्य ठोकताळे वापरतो यामध्ये जुनी ग्रामनामे, प्रवाशांची वर्णने, प्राचीन साहित्य, पौराणिक व दंतकथा, पांढरीची टेकाडे, प्राचीन लेख या द्वारे योजनाबद्ध समन्वेशन करुन अशा प्राचीन स्थळांपर्यंत पोहचतो. ज्या स्थळांचे वा टेकाडांचे उत्खनन करावयाचे आहे. त्याचे संपूर्ण सर्वेक्षण करुन त्या आधारे मिळणारे पुरावे व | त्याला कांही शास्त्रीय पद्धतीची जोड देवून एखादे विशिष्ट ठिकाण व त्या टेकाडाच्या अथवा उत्खनन स्थळाच्या स्वरुपावरुन कोणती शास्त्रीय उत्खनन पद्धती वापरायची हे ठरवतो.

**चैत्यगृह तेर:**

बौद्ध धर्मीयांचे प्रार्थनास्थळ म्हणजे चैत्यगृह होय. बौद्ध लेण्यांमध्ये प्रामुख्याने दोन प्रकार च्या वास्तु असत विहार व चैत्य, विहार हे बौद्ध भिक्युंना राहण्यासाठी असत. व चैत्य हे प्रार्थना, प्रवचन इत्यादीसाठी वापरत असत. चैत्यगृहात प्रवेश केल्यावर मोकळी जागा असते. तर समोरच्या टोकास स्तुप बांधलेला असे. या स्तुपामध्ये गौतम बुद्धांच्या किंवा त्यांच्या शि ष्यांच्या अस्थी किंवा त्यांच्या वस्तु ठेवत असत व त्यांची पुजा केली जाई. पूर्ण चैत्यगृहात स्तुपाला प्रदक्षिणापथ असे. चैत्यगृहाचे विधान (ग्राउंडप्लॅन) हा चापाकृती असतो. तर वितान (सिलींग) गजपृष्ठाकार म्हणजेच हत्तीच्या पाठीप्रमाणे असते.

तेर येथे असलेला चैत्य स्तुप हा येथे असणारा बौद्ध धर्माचा प्रभाव सिद्ध करतो. हे चैत्य गृह गावाच्या पश्चिम दिशेस नवीन बसस्थानकाच्या समोर आहे. या चैत्यगृहाचा शोध जनावरांचा गोठा बांधण्यासाठी पाया खणत असताना लागला. हे चैत्यगृह माती व विटांपासून बनवलेला आहे. या चैत्यगृहाची लांबी 9 मीटर आणि रुंदी 5 मीटर आहे. चैत्यगृहाचे विधान हे चापाकृती आहे. चैत्याच्या वर्तुळाकृती भागापाशी विटांपासून बनविलेला स्तुप आहे. चैत्य गृहाच्या मुळ पायापासून विटांचा थर वरील बाजूस चढविलेला आहे. त्यामुळे चैत्य कसा होता याची कल्पना येते.

**या चैत्यगृहाची अनेक वैशिष्ठये आहेत. त्यापैकी पुढील कांही आहेत:**

१. चैत्यगृहाच्या अर्धवर्तुळाकृती भागात सव्वा मीटर व्यासाचा स्तुप आहे.
२. दरवाज्यातुन आत शिरण्यासाठी तीन पायऱ्या होत्या परंतू जमीनीच्या पातळीत भर घालून उंची वाढविण्यात आली. याच वेळी पायऱ्या नाहीश्या झाल्या असाव्यात.

३. चैत्यगृहाच्या भिंती जाड होत्या आणि त्यातील विटांचे बांधकाम सांधेमोड रचनेत अस ल्याने हे बांधकाम मजबुत स्वरुपाचे केलेले आढळते.
४. विटांनी बांधलेले चैत्य स्तुप भारतात फारसे उपलब्ध नाहीत. सदरील चैत्याचे जतन व संवर्धन महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभागाने केले आहे. व सध्या ते पर्यटकांना पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

**तेरशी संबंधित शिलालेख नाणी व ताम्रपट:**

तेरची ऐतिहासिक माहिती प्राचीन शिलालेख, ताम्रपट, ग्रंथ व ऐतिहासिक अवशेषाद्वारे प्राप्त होते. त्याचे अवशेष आजही 'रामलिंगप्पा लामतुरे' संग्रहालयात पाहण्यास उपलब्ध आहेत..

१. तेर येथील उत्खननात सातवाहनांची ७० नाणी सापडली आहेत. ती नाणी तांबे व शिशाची आहेत. त्यावर धम्मलिपीतील अक्षरे कोरली आहेत.
२. इ.स. १९६७-६७ च्या उत्खननात पक्क्या विटांनी बांधलेल्या चक्राकार स्तुपात सातवाहन राजा पुलुमावीचे इ.स. दुसऱ्या शतकातील नाणे सापडले आहे.
३. ४ मे १९८६ रोजी एका शेतात शहाबादी दगडावर धम्मलिपीत कोरलेला शिलालेख सापडला आहे. त्यात 'वसिष्ठी पुलुमावी' या सातवाहन राजाचा उल्लेख आहे.
४. तेरवर सातवाहन राजांची सत्ता होती. त्यांनी तेर येथे भव्य बौद्ध स्तूप बांधले होते, हे तेथील नाण्यांवरून व स्तुपाच्या अवशेषांवरून स्पष्ट होते. ती शिलालेख शिला आता 'रामलिंगप्पा लामतुरे' संग्रहालयात जनत करून ठेवलेली आहे.
५. तेरच्या समकाळात सातवाहन राज्यातील हळीहंडरगुळी, मुरुम, सावरगाव व वडगाव ही प्रमुख गावे होती.
६. हैद्राबाद ताम्रपट, कासारसिरसी ताम्रपट, बोरगाव दानपत्र, सांगळूद ताम्रपट, तेर येथील कळचुरीचे शिलालेख, सिताबल्डी शिलालेख, गणेशवाडी शिलालेख, रामलिंग मुदगड, अणदूर शिलालोख, शिलाहारांचे शिलालेख व यादवकालीन, शिलालेख, ताम्रपटात व 'तर' ची ऐतिहासिक माहिती ज्ञात होते.

# प्रकरण पाचवे :

# कै. रामलिंगाप्पा लामतुरे शासकीय वस्तुसंग्रहालय, तेर

## प्रकरण पाचवे

## कै.रामलिंगअप्पा लामतुरे शासकीय वस्तुसंग्रहालय,तेर

तेर येथील रामलिंगप्पा लामतुरे यांनी आपला छंद म्हणून तेरमधील सर्व प्राचीन वस्तूंचा संग्रह आपल्या घरी केला होता. २५ ते ३० वर्षांत जमा केलेल्या सर्व प्राचीन वस्तू रामलिंगप्पा यांनी आपल्या संग्रहालयात जमा केल्या होत्या. ते इतिहासप्रेमी होते. शासनाने त्या सर्व वस्तू घेऊन आता 'रामलिंगप्पा लामतुरे पुराणवस्तुसंग्रहालयाची उभारणी केली आहे. तेथे तेरमध्ये सापडलेल्या व रामलिंगप्पा लामतुरे यांनी संग्रह केलेल्या सर्व प्राचीन वस्तू संग्रहित केलेल्या आहेत. तेरचे प्राचीन वैभव या संग्रहालयात पाहत येते. त्यासाठी रामलिंगप्पा लामतुरे यांचे कष्ट, छंद व इतिहासप्रेम कारणीभूत ठरलेले आहे. तेर येथे पुरातत्त्वशास्त्राच्या संशोधिका डॉ. माया पाटील यांनी २०१५ मध्ये उत्खननास प्रारंभ केला. तेव्हा तेथे सात टेकड्या सापडल्या त्यापैकी कोट, वैराग व कैकाडी टेकड्यावर उत्खनन करण्यात आले. त्या उत्खननात सातवाहनकालीन अवशेष सापडले आहेत. तेर येथे आणखी उत्खनन केल्यास बौद्ध धम्माशी संबंधित प्राचीन वस्तू भेटण्याची दाट शक्यता आहे. 'तेर' हे थेरांचे वसतिस्थान होते हे सर्वसिद्ध होत आहे.

तेरचे रहिवासी श्री रामलिंगअप्पा खंडप्पा लामतुरे यांनी 'तेरला' जगप्रसिद्ध केले आहे. गेल्या २५ ते ५० वर्षांमध्ये 'तेर' येथे सापडलेल्या प्राचीन कलात्मक वस्तूंचा त्यांनी केलेला संग्रह भारतातच नव्हे, तर परदेशातही नावाजला गेला आहे. म्हणून आजही 'तेरला' भारतीय व परकीय विद्वान भेट देण्यास उत्सुक असतात. तेर या गावची ख्याती खऱ्या अर्थी त्यांच्या पुरातन वस्तूंच्या संग्रहामुळे झाली आहे. त्यांचे चिरंजीव भागवतअप्पा लामतुरे त्यांचाही वाटा अमुल्य आहे. हा संग्रह एक अनमोल ठेवा असून, त्यांचे इतिहासप्रेम, कलासक्ती व आपल्या प्राचीन सांस्कृतिक वारशाबद्दलची आत्मीयता व जिव्हाळा दिसून येतो. त्यांनी तेरचे एक प्रतिष्ठित व धनवान नागरिक म्हणून लौकिक संपादन केला.

एक छंद म्हणून त्यांनी तेरच्या परिसरात सापडणाऱ्या जुन्या वस्तूंचा संग्रह करण्यास सुरुवात केली. २०-२५ वर्षांत त्यांनी एक स्वतंत्र संग्रहालय सुरुवात होईल, इतक्या विविध जुन्या वस्तू जमा केल्या. या संग्रहाची ख्याती दूरवर पसरू लागली. अनेक भारतीय परदेशी विद्वान संशोधक न चुकता तेरला भेट देऊ लागले. संशोधकांनी हा अमूल्य खजिना अभ्यासला. गावातील शाळकरी मुलांना पैसे देऊन व त्यांनी हाती येईल ते साहित्य जमा करून ऐतिहासिक

वारस च सर्वांपुढे प्रदर्शित केला. उस्मानाबादचे जिल्हाधिकारी, देवसिंग चौहान यांनी संग्रहालयासाठी विनामूल्य जागा दिली. १९६७ साली शासनाने हा संग्रह घेण्याचा निर्णय केला. त्यावेळी या संग्रहात ५००० वस्तू होत्या. यात नाणी, माती व हस्तिदंताच्या वस्तू, मूर्ती, विविध प्रकारचे मणी. अलंकार, साचे, रोमन वस्तू इत्यादी वस्तू आहेत.

रामलिंगप्पा खंडाप्पा लामतुरे यांनी २३००० पेक्षा अधिक तेर येथील सर्व प्राचीन वस्तू महाराष्ट्र शासनाला दान दिल्या. तेव्हा महाराष्ट्र शासनाने सन १९६७ साली कै. रामलिंगप्पा लामतुरे यांच्या सन्मानार्थ त्यांच्याच नावाने तेर येथे रामलिंगप्पा लामतुरे शासकीय वस्तुसंग्रहालयाची स्थापना केली. या संग्रहालयाची आज स्वतंत्र इमारत उभी आहे. तेथे सर्व तेरचे अवशेष विविध दालनात संग्रहित करून ठेवले आहेत. महाराष्ट्रात एका व्यक्तीच्या नावाने चालणारे 'तेर' येथील करून महाराष्ट्र शासनाचे हे एकमेव 'शासकीय वस्तुसंग्रहालय आहे. हा के.. रामलिंगप्पा लामतुरे यांचा मोठा सन्मान आहे. येथे तीन ते चार कर्मचारी पूर्णवेळ कार्यरत आहेत. विविध इतिहास संशोधक, लेखक, साहित्यिक, अभ्यासक, पर्यटक आणि विविध शाळा-महाविद्यालयांच्या सहली या प्राचीन वस्तुसंग्रहालयास भेट देतात. प्राचीन तेरचा इतिहास व संस्कृती जाणून घेतात. तेरचा प्राचीन इतिहास येथे जिवंत झाला आहे. या संग्रहालयाच्या उभारणीत कै. रामलिंगप्पा लामतुरे यांचे योगदान सर्वांत महत्त्वाचे राहिले आहे. या संग्रहालयाचा दूरध्वनी क्र. ०२४७२-२३३५२६ असा असून ते सकाळी १०.०० ते सायं. ०५.०० या वेळेत खुले असते. हे संग्रहालय सोमवारी बंद असते. 'रविवारी पूर्णवेळ चालू असते. दिपावली, दसरा, होळी व पाडवा या सणांशिवाय हे संग्रहालय नित्यनेमाने चालू राहते.

# प्रकरण सहावे : उपसंहार

# प्रकरण सहावे

## उपसंहार

इतिहासाचे लेखन आणि अभ्यास हा भूतकाळासंबंधी माहिती देऊ शकणाऱ्या विविध साधनांवर अवलंबून असतो. भूतकाळाविषयीची माहिती ज्यातून मिळू शकते अशा साधनांना इतिहासाच्या अभ्यासाची साधने म्हणता येते. भूतकाळाविषयी माहिती देणारी अशी साधने विविध स्वरूपाची असतात. त्यांचे वर्गीकरण विविध निकष लावून करण्यात येते. भूतकाळात घडलेल्या घटनांची कालक्रमानुसार शास्त्रशुद्ध आणि पद्धतशीर दिलेली माहिती म्हणजे इतिहास होय व्यक्ती समाज स्थळ आणि काळ हे चार घटक इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत. इतिहास हा विश्वसनीय पुराव्यांवर आधारित असतो या पुराव्यांना इतिहासाची साधने असे म्हणतात. साधनांचे भौतिक साधने, लिखित साधने आणि मौखिक साधने असे वर्गीकरण करता येते. त्याचप्रमाणे इतिहासात साधनांचे मुल्यमापन देखील केले जाते. ज्या ऐतिहासिक घटनेचा अभ्यास करायचा असतो तिच्याशी संबंधित अशा अनेक बाबींचा विचार करावा लागतो. त्यासाठी ऐतिहासिक साधनांचा आधार घेतला जातो, ही साधने तपासून घेणे गरजेचे असते.त्याचा अस्सलपणा तपासावा लागतो. या साधनांचा तारतम्याने व चिकित्सकपणे वापर करणे आवश्यक असते.

इतिहास लिहिण्यासाठी पहिल्यांदा साधनांचा शोध घ्यावा लागतो. हा शोध फारसा अवघड नाही. मात्र तो सोपाही नाही. इतिहासकार विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांची उभी हयात इतिहासाची साधने गोळा करण्यामध्ये खर्च झाली. प्रत्येक इतिहासकार हा शोध घेणारा एका अर्थाने "हुडक्या" असावा लागतो. इतिहास साधनांचा शोध घेतल्यावर ती वापरतानाही विशेष काळजी घ्यावी लागते. डॉ. राजा दीक्षित यांच्या शब्दात सांगायचे तर, आपणास गांधीजींचा "साधनशुचिता" हा शब्दप्रयोग वापरावयास हवा. त्या साधनांची विश्वनियता व अस्सलता तपासावी लागणार आहे. मात्र एखादे साधन हाती पडल्यावर लगेच त्याच्याकडे अस्सल म्हणून पाहू नये. याठिकाणी आपण "काय भुललास वरलिया रंगा" हे वाक्य आठवावे. वरवर न पाहता कागदाच्या आतील मजकूर पाहणे आवश्यक आहे.इतिहासाचे लेखन करताना आपण अचूकता पाळावी. "अचूकता हे कर्तव्य आहे,गुण नव्हे" अचूकता ही इतिहासलेखनाची पूर्वअटच आहे. आपण जी साधने गोळा करतो त्या प्रत्येक साधनामध्ये इतिहास दडलेला असतो. तो शोधून मांडण्याची दृष्टी इतिहासकाराने विकसीत करावयास हवी.

गतकालीन मानवाची वाटचाल समग्रपणे, विश्वसनीयरित्या, सलगपणे समजून घेण्यासाठी ज्या-ज्या अभ्यासशाखा उपयुक्त ठरतात त्यांना इतिहासाच्या दुय्यम अभ्यासशाखा असे म्हणतात.

**इतिहासाच्या दुय्यम अभ्यासशाखांत समाविष्ट विषय:**

१. कालगणना शास्त्र
२. कालक्रम (Chronology)
३. आलेखशास्त्र (Graphology)
४. नाणकशास्त्र (Numismatics)
५. शिलालेख शास्त्र (Epigraphy)
६. मूर्तीकलाशास्त्र (Iconography)
७. हस्तातरशास्त्र (Palaeography)
८. मुद्राशास्त्र
९. पुरातत्वशास्त्र- (Archaeology)
१०. संदर्भग्रंथसूची (Bibliography)
११. स्थापत्यशास्त्र

ही शास्त्रे परिपूर्ण अभ्यास शाखा म्हणून प्रस्थापित होवू शकत नाहीत. या सर्व शाखा या इतिहासाच्या दुय्यम अभ्यास शाखा आहेत. या शास्त्राचे अध्यन इतिहासाच्या विश्वसनीय मांडणीला उपयुक्त असते. या अभ्यास शाखा पूर्णपणे इतिहासावर अवलंबून असतात. स्वतंत्र अभ्यास शाखा म्हणुन त्यांचे अस्तित्व नसते. मात्र भूतकालीन वाटचालीतील पाउलखुणा शोधण्याचे तंत्र या अभ्यास शाखांनी विकसित केलेले आहे. त्याचप्रमाणे पुरातत्व शास्त्राचा अभ्यास इतिहासात केला जाऊ लागला. पुरातत्त्व शास्त्रामुळे उत्खननात सापडलेल्या अवशेषांचा अभ्यास केला जाऊ लागला. त्यावरून प्राचीन संस्कृति समजून आली .

पुरातत्वशास्त्र हे असे विज्ञान आहे जे प्राचीन वस्तूंचा अभ्यास आणि विश्लेषण करून मानवी संस्कृतीचा विकास समजून घेण्याचे आणि स्पष्ट करण्याचे कार्य करते. हे विज्ञान प्राचीन

काळातील अवशेष आणि भौतिक उत्खननाच्या विश्लेषणाच्या आधारे भूतकाळातील मानवी समाजाचा सांस्कृतिक-वैज्ञानिक अभ्यास करते. यासाठी प्राचीन वास्तू, घरगुती वस्तू, नाणी, मणी, खेळणी, शेतीविषयक कामे, अवजारे, उपकरणे, जैविक तथ्ये आणि सध्याच्या मानवाच्या पूर्वजांनी वापरलेली भूस्वरूपे यांचा अभ्यास केला जातो.

पुरातत्वशास्त्र म्हणजे मानवाने सोडलेल्या कलाकृती, आर्किटेक्चर आणि सांस्कृतिक लँडस्केप यासारख्या पर्यावरणीय डेटा आणि भौतिक संस्कृतीच्या पुनर्प्राप्ती आणि विश्लेषणाद्वारे भूतकाळातील मानवी क्रियाकलापांचा अभ्यास. उत्खनन आणि पुरात्वशास्त्र समजून घेतल्यानंतरच आपल्याला प्राचीन वास्तू सुरक्षित जतन करून ठेवता येतात त्यामुळे आपण उत्खनन आणि पुरात्वशास्त्रा ची थोडी माहिती करून घेवू या. इ.स.पू 6 व्या शतकातिल बाबिलोनचा राजा नबोनिदास याला प्राचीन अवशेषांचा आद्य संशोधक मानले जाते. सिप्पर येथे शमाश देवतेच्या मंदिराची दुरुस्ती करताना त्याने पाया खणला तेव्हा सुमारे 20 फूटांवर त्याला त्याच मंदिराचा त्यातूनही २००० वर्षापुर्वीचा पाया तापडला. याशिवाय या राजाने आपल्या राजवाड्यात एक प्राचीन वस्तूंचे संग्रहालय ही बनवून घेतले होते.

पुरातत्वविदेयचा इतिहासाशी अतिशय घनिष्ट संबंध आहे. इतिहासाची जी अनेक साधने असतात. त्यांपैकी पुरातत्वविदया हे एक महत्त्वाचे साधन आहे. इतिहासातील घटनांचा लेखी पुरावा उपलक्ष्य असला तरी कितक वेळा त्या घटना सिद्ध करण्यासाठी केवळ पुरातत्वीय पुराव्यावर अवलंबून रहावे लागते. पुरातत्वविदेचे मुख्य म्हणजे प्राचीन मानवी संस्कृतीचा अभ्यास करणे हा आहे. पण पुरातत्वविदया म्हणजे प्राचीन संस्कृतीचे केवळ वर्णन किंवा अभ्यास करणे नव्हे तर प्राचीन अवशेषांचे संशोधन करून त्याचे जतन करून मानवाच्या सांस्कृतिक काळाचा अभ्यास करणे हे पुरातत्वविदेचे मुख्य उद्दिष्टे असते. या उद्देशानेच तेर या प्राचीन वारसा लाभलेल्या गावात अनेक उत्खनने झाली. त्यातून तेरचा वैभव शाली इतिहास समोर आला.

उस्मानाबाद जिल्हयात तेरणा नदीच्या काठी वसलेले 'तेर' हे गाव आहे. उस्मानाबाद शहरापासून 23 किमी अंतरावर प्राचिन वारसा लाभलेल तेरणा हे गाव आहे. प्राचीनकाळी तेरे हे गाव शिल्प, कला व व्यावार या दृष्टीने प्रसिद्ध होते. या गावचे धार्मिक दृष्टीने एक वेगळे महत्त्व ही आहे. मराठी भाषेचे कवी व वारकरी संप्रदायाचे विठ्ठल भक्त संत गोरोबा काका यांची समाधी ही तेर या गावीच आहे. गोरोबाकांची समाधि तेरणा नदीच्या काठी बांधलेली आहे. या धार्मिक महत्वाव्यतिरिक्त तेर हे आपल्या प्राचीन शिल्प, व्यापारासाठी प्रसिद्ध आहे.

गावात जैन मंदिरे व बौद्ध स्तूप आहेत. यातिल बरीचशी बौद्ध स्तूपे ही उत्खननात सापडलेली आहेत. तेरमध्ये एक सरकारी वस्तूसंग्रहालय आहे ज्यात जुन्या वस्तूंचा संग्रह आहे.

काही प्राचीन ग्रंथात तेर या गावाचे तगर, तगरपुर, तगरनगर असा उल्लेख आढळून येतो. संस्कृतभाषेत या नगराला 'तगरम्। अरते म्हटले गेले . प्राचीन काळी तेर हे एक व्यापारी नगर घेते. तेर ते उज्जयी हा प्राचीन काळी प्रमुख व्यापारी मार्ग होता. सातवाहन राजांच्या काळात या नगरीने यशाचे, प्रगतीचे शिखर गाठले होते. तेरचा त्याकाळी युरोपमधील रोम व ग्रीस देशांशी व्यापारी संबंध होता. या अश्या ऐतिहासिक तेरच्या संशोधनासाठी केलेल्या उत्खननात सातवाहनकालीन नाणी सापडली आहेत. तेथे शिलाघरांची नाणी व मुद्रा सापडल्या आहेत. महाराष्ट्र शासनाच्या पुरात्व खात्याने केलेल्या उत्खननात सातवाहनकालीन स्तूपांचे अवशेष, नाणी, मूर्ति, रोमन मृत्पात्रे व पुतळया सापडल्या आहेत प्राचीन स्तूपांचे अवशेष ही तेरमध्ये सापडले आहेत. यावरुन आपल्याला तेर किती समृद्ध होते ते समजते.

सातवाहन काळात तेर' हे बौद्ध धम्म व जैन धम्माचे प्रमुख केंद्र होते. १९६८ च्या उत्खननावरून तेर हे बौद्ध धम्माचे प्रमुख केंद्र असल्याचे सिद्ध झाले आहे. सम्राट अशोकाच्या नंतर दक्षिण पथावर इ. स. पूर्व दुसऱ्या शतकात सातवाहनांनी सत्ता काबीज केली. तेर नगरीचा तो खऱ्या अर्थाने सुवर्णकाळ होता. तेव्हा तेरचा विस्तार मोठा होता. ते उत्तर दक्षिण पथाशी जोडले होते. सातवाहनकालीन व्यापाऱ्यांचे ते प्रसिद्ध व्यापार केंद्र होते. सातवाहनाची 'तेर' ही उपराजधानी होती. तेर हे सातवाहन काळात दक्षिणपथातील कापड उत्पादनाचे एक प्रमुख व्यापारी केंद्र होते. सातवाहन घराण्यातील राजा सातकर्णी, गोतमीपुत्र सातकर्णी व शिष्ठीपुत्र पुलुमावी व यज्ञश्री सातकर्णी या पराक्रमी राजांनी तेरची भरभराट केली होती. सातवाहन काळात तेर येथे बौद्ध 'थेरं ' मोठ्या संख्येने राहात होते. त्यांना राहण्यासाठी तेर येथे बौद्ध विहार, चैत्य व स्तूप निर्माण केले होते. तेरचे नावच 'थेर'वरून 'तेर' झाले आहे. तेर हे इ.स. पूर्व दुसऱ्या शतकात सातवाहन राजाच्या काळात बौद्ध धम्मप्रसारोच प्रमुख केंद्र होते. व्यापारासोबतच तेरमधून बौद्ध धम्माचा प्रसारही मोठ्या प्रमाणावर होत होता. तेर येथील उत्खननात खालील बौद्ध स्तुपांचे अवशेष सापडले आहेत.

तेर हे प्राचीन ऐतिहासिक नगर आहे. तेरला ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. या वारशाचे जतन झाले पाहिजे. तेरमध्ये असलेल्या पांढरया मातिच्या ढिगाऱ्याचे उत्खनन करून

प्राचिन अवशेषांचा अभ्यास आपली संस्कृती जतन करून ठेवून. विद्यार्थ्यांमध्ये तेरविषयी व तेथिल ऐतिहसिक  अवशेषाविषयी आकर्षण निर्माण करणे यासाठी या प्रकल्प अभ्यासाचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. प्राचीन वस्तूंचे अवशेष तेरला सापडले आहेत. महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्व विभागाने ऐतिहासिक महत्व ओळखून येथे उत्खनन केले आहे. त्यात प्राचिन स्तूपाचे, वस्तूचे अवशेष प्राप्त झाल आहेत .त्यांचे जतन करणे गरजेचे आहे. ऐतिहासिक महत्व लक्षात घेवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ व इतर इतिहास अभ्यासक मंडळीनी उत्खनन, संशोधन व अभ्यास करून, तेरचे प्राचिन ऐतिहासिक महत्त्व जगापुढे आणले होत.त्याचबरोबर या प्राचीन अवशेषांचे सरकारकडून जतन – संवर्धन केले पाहिजे.येणाऱ्या पिढीसाठी हा वारसा जतन करून ठेवने आपले कर्तव्य आहे. या आधुनिक जगात आपण आपली संस्कृती जपून ठेवली पाहिजे.

या प्रेरणेतून तेरमध्ये एक वस्तुसंग्रहालय निर्माण झाले. तेरचे प्राचीन वैभव या संग्रहालयात पाहत येते. त्यासाठी रामलिंगप्पा लामतुरे यांचे कष्ट, छंद व इतिहासप्रेम कारणीभूत ठरलेले आहे. रामलिंगप्पा लामतुरे यांनी आपला छंद म्हणून तेरमधील सर्व प्राचीन वस्तूंचा संग्रह आपल्या घरी केला होता. २५ ते ३० वर्षांत जमा केलेल्या सर्व प्राचीन वस्तू रामलिंगप्पा यांनी आपल्या संग्रहालयात जमा केल्या होत्या. ते इतिहासप्रेमी होते. शासनाने त्या सर्व वस्तू घेऊन आता ‘रामलिंगप्पा लामतुरे पुराणवस्तुसंग्रहालयाची उभारणी केली आहे. तेथे तेरमध्ये सापडलेल्या व रामलिंगप्पा लामतुरे यांनी संग्रह केलेल्या सर्व प्राचीन वस्तू संग्रहित केलेल्या आहेत.अश्या ध्येय वेढया रामलिंगप्पा लामतुरे यांना त्यांच्या या कार्यासाठी मी सलाम करतो.तेर गावात विटांनी बांधलेली तीन मंदिरे तीन वेगवेगळ्या ठिकाणी आहेत. त्रिविक्रम मंदिर गावाच्या मध्यभागी आहे. उत्तरेश्वर मंदिर हे त्रिविक्रम मंदिराच्या पश्चिमेला आहे. कालेश्वर मंदिर हे त्रिविक्रम मंदिराच्या उत्तरेला आहे. त्याचबरोबर तेर येथे असलेला चैत्य स्तुप हा येथे असणारा बौद्ध धर्माचा प्रभाव सिद्ध करतो. हे चैत्य गृह गावाच्या पश्चिम दिशेस नवीन बसस्थानकाच्या समोर आहे. या चैत्यगृहाचा शोध जनावरांचा गोठा बांधण्यासाठी पाया खणत असताना लागला.

आज तेरला संत गोरोबा काकांचे तेर म्हणून ओळखले जाते. वारकरी संत परंपरेतील संत गोरोबा काका हे अग्रगण्य संत होऊन गेले. ते तेरचे रहिवासी होते. तेर येथे त्यांचे घर निवासस्थान आजही आहे. संत गोरोबा काकांचे अभंग प्रसिद्ध आहेत. तेरणा नदीकाठी गोरोबा


काकांचा मठ आहे. तेथे त्यांची 'समाधी' आहे. तेथे विविध कार्यक्रम- उत्सव साजरे केले जातात. या समाधी परिसरात आता विविध सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत.असे हे तेर आज विविध धर्मपंथांचा वारसा जतन करणारे एक ऐतिहासिक 'नगर' म्हणून अस्तित्वात आले आहे.या ऐतिहासिक नगराकडे सरकारचे म्हणावे तेवढे लक्ष नाहिये. आपला समृद्ध वारसा जतन करून ठेवण्यासाठी सरकारने याकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. कमीत कमी प्राचीन असलेल्या वास्तू भोवती संरक्षण भिंत उभारली पाहीजे.सरकारने अत्याधुनिक सुविधा आणून तेर नगरला एक पर्यटन स्थळ म्हणून विकसित केले पाहिजे. ज्यातून सरकारला फायदा ही होईल आणि तेरचा पर्यटन स्थळ म्हणून विकास ही होईल. तेर प्राचीन काळी खूप समृद्ध असले तरी आता तेर ग्रामीण भागात येते .त्यामुळे तेरचे पूर्वीचे वैभव नष्ट झाले आहे. तेरला पर्यटन स्थळ म्हणुन विकसित करून त्याचे पूर्वीचे गतवैभव सरकारने परत मिळवून दिले पाहिजे. यासाठी सर्व नागरिक , इतिहास संशोधक- अभ्यासक यांनी प्रयत्न केले पाहिजे.आजच्या आधुनिक युगात सरकारने तेरच्या पर्यटनासाठी Social Media चा योग्य वापर करून जाहिरात बाजी केली पाहिजे जेणेकरून अधिक अधिक लोक तेरच्या भेटीसाठी आले पाहिजेत. या जाहिरातीच्या माध्यमातुन आपल्या एतिहासिक अवशेषांचे जतन - संवर्धन करण्यासाठी जनजागृती केली पाहिजे.

# परिशिष्टे

## तेरमधील येथील उत्खननात सापडलेल्या वस्तू (निवडक):




संदर्भ: कै. रामलिंगाप्पा लामतुरे शासकीय वस्तुसंग्रहालय, तेर




संदर्भ: कै. रामलिंगाप्पा लामतुरे शासकीय वस्तुसंग्रहालय, तेर

## तेरमधील येथील उत्खननात सापडलेल्या वस्तू (निवडक):




संदर्भ: कै. रामलिंगाप्पा लामतुरे शासकीय वस्तुसंग्रहालय, तेर




संदर्भ: कै. रामलिंगाप्पा लामतुरे शासकीय वस्तुसंग्रहालय, तेर

## तेरमधील येथील उत्खननात सापडलेल्या वस्तू (निवडक):







संदर्भ: कै. रामलिंगाप्पा लामतुरे शासकीय वस्तुसंग्रहालय, तेर





संदर्भ: कै. रामलिंगाप्पा लामतुरे शासकीय वस्तुसंग्रहालय, तेर

## तेरमधील उत्खनने:



कोट टेकडी येथील उत्खनन मृदुभांडे व कौल


सातवाहन राजा वशिष्ठीपुत्र पुळुमावी चे दोन शिडांच्या जहाजाचे नाणे


मृदभांड्यांचे अवशेष बैराग पांढर, तेर उत्खनन २०१४-१५.


चक्राकार स्तुप 1967–68

## तेरमधील उत्खनने:



आड, कोट, तेर उत्खनन २०१४-१५.



तिर्थकुंडात सापडलेली हस्तीदंती फणी 1987–88



घराचा पाया, कोट, तेर उत्खनन २०१४-१५.



चैत्य स्तुप